
# मंजिरी

सोनाली सामंत



ई साहित्य प्रतिष्ठान

# मंजिरी

(लघुकादंबरी)

लेखिका

सोनाली सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान

# मंजिरी


## लेखिका : सोनाली सामंत

फोन नं. ९७६२५४७५२०

E-mail: sonali.samant1@gmail.com


या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmaaail.com

प्रकाशन : १३ एप्रिल २०१७

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# मनोगत




"मौनात अर्थ सारे" या माझ्या पहिल्याच लघु कादंबरीला खुप छान प्रतिसाद मिळाल्याबद्दल मी वाचकांचे मनःपूर्वक आभार मानते. तसेच यासाठी मला मदत केल्याबद्दल टिम 'ई साहित्य प्रतिष्ठानची' सुद्धा खुप आभारी आहे. 'मंजिरी' ही कादंबरीसुद्धा प्रेमकथेवरच आधारीत आहे. एखाद्याच्या सौंदर्यावर भुलून जे प्रेम करतात अश्या लोकांना बरेचदा 'का भुललासी वरलीया रंगा' असं म्हणायची पाळी येते. याच वाक्प्रचारावर आधारित ही कथा रचण्याचा मी प्रयत्न केला आहे. आशा करते वाचकांना नक्की आवडेल. आपल्या प्रतिक्रियांच्या प्रतीक्षेत!

## ओळख



मी महावितरणमध्ये डेप्युटी मॅनेजर म्हणुन कार्यरत आहे. माझे जन्मस्थान व कर्मभुमी सिंधुदुर्ग. लेखन हा माझा छंद आहे. लिहायला बसल्यावर इतर सर्व विचार दूर जातात. ती एक नशा वाटते. वेगळ्याच जगात वावरत असल्यासारखं वाटतं. काल्पनिक पात्र आपलीशी वाटतात. एखादा चित्रपट पाहत असल्यासारखी कथा समोर ठाकते.

सुहास शिरवळकर, नारायण धारप, शोभा राऊत, योगिनी जोगळेकर यांचे साहित्य वाचायला मला खुप आवडते. ही सर्वजण माझी प्रेरणास्थाने आहेत.

## संपर्क

फोन नं. ९७६२५४७५२०

E-mail: sonali.samant1@gmail.com

## अर्पणपत्रिका

ज्याचे ऋण कधीही फिटणार नाहीत

असा माझा मामा

श्री. महेश बाबुराव ठाकुर यास अर्पण.

----सोनाली सामंत

# मंजिरी

"काय रे आदु, किती तुझे हे मिस्ड कॉल्स! मी पार्लरमध्ये होते," रुचा लडिवाळपणे म्हणाली.

"अरेच्या, अग आधी एक मेसेज तरी करायचा ना! आपलं आज मुव्हीच ठरलं होतं. मी तिकीट पण काढलेली," वैतागून आदित्य म्हणाला.

"अरे हो, पण माझ्या मैत्रिणीला आजच पार्लरमध्ये जायचं होतं. प्लीज तू थोडं समजून घे ना. उद्या जाऊ आपण," रुचा आधीच्याच गोड आवाजात म्हणाली.

"उद्या मला खुप कामं आहेत. नंतर करू आपण प्लॅन," आदित्य नाराजीनेच म्हणाला.

'ओ.के.कुल डीअर. आपण नंतर जाऊ. अँड आय ॲम रिअली व्हेरी सॉरी फॉर टुडे. वेल आय ॲम बिझी नाऊ. विल कँच यु लॅटर हनी. बबाय!" रुचा मधाळपणे म्हणाली आणि तिने फोन ठेवला.

'ए रुचा काय मस्त जमतं यार तुला आदित्यला हँडल करायला. तुझ्या ताटाखालचं मांजर आहे तो," स्वप्ना म्हणजे रुचाची मैत्रीण हसत म्हणाली.

"असं नको म्हणू ना यार प्लीज. आय लव्ह हिम," रुचा नाराज व्हायची ॲक्टींग करत म्हणाली आणि मग दोघी खळखळून हसायला लागल्या.

रुचा जोशी म्हणजे वेल नोन लीगल ॲडव्हायजर राम जोशी यांची एकुलती एक मुलगी. पेशाने वकील असल्याने समोरच्याला कसे हँडल करायचं ते तिला उत्तम जमायचं. लहानपणापासून लाडात वाढल्याने आणि संपत्तीबरोबरच देवाने रूप देण्यात काही कमतरता न ठेवल्याने म्हणा रुचा स्वभावाने गर्विष्ठ होती. लॉ कॉलेजला असताना तिला आलेली कित्येक प्रपोजल्स तिने धुडकावुन लावली होती. वर्गात तिच टॉप असल्याने तिला इतर सर्व खिजगणतीत नसल्यासारखे वाटायचे. अशात तिची ओळख झाली आदित्यशी. आदित्य गोखले म्हणजे गोखले इंडस्ट्रीजचा मालक. अर्थात होणारा मालक कारण जेव्हा ती दोघं भेटली तेव्हा आदित्य बि.ई. च्या तिसऱ्या वर्षाला होता.

आदित्य म्हणजे थोडंक्यात सांगायचं तर सुसंस्कारी मुलगा. दिसायला एकदम राजबिंडा आणि स्वभावाने मनमिळाऊ. त्याच्या मागे-पुढे करणाऱ्या अनेक मुली होत्या पण प्रेम या सगळ्यावर त्याचा फारसा विश्वास नव्हता किंवा त्याला तशी स्पेशल कोणी भेटली नव्हती. गोविंद गोखले यांचा आपल्या मुलावर खूप जीव होता. एकुलत्या एक असलेल्या आदित्यावर संस्कार करताना ते कुठेच कमी पडले नव्हते. गायत्री गोखले म्हणजे आदित्यची आई समाजकार्याची अत्यंत आवड असलेली व्यक्ती. नावाप्रमाणेच त्या गायत्री होत्या. समाजकार्याबरोबर त्यांना देवा-धर्माची सुद्धा आवड होती. एवढे मोठे इंडस्ट्रीअलीस्ट असूनही 'गोखले' कुटुंबाला गर्वाने स्पर्श केला नव्हता. अशा वातावरणात वाढलेल्या आदित्यला जेव्हा रुचा भेटली तेव्हा प्रथम त्याला ती आवडली नव्हती. पण रुचाला आदित्य पाहताक्षणी आवडला होता. आजवर आवडलेली प्रत्येक गोष्ट तिला मिळाली होती. आदित्यला आपलंसं करायचं एवढाच तिने ध्यास घेतला.

शेवटी आदित्य सुद्धा एक मुलगाच होता. गुण, रूप आणि संपत्ती या सर्वच गोष्टी वरचढ असलेल्या रुचाकडे तो ओढला गेला. लवकरच दोघं एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडाले. आदित्यच्या दिवसाची सुरुवात रुचापासून व्हायची आणि तिला गुड नाईट करूनच रात्र संपायची. चार वर्ष दोघं एकत्र होती. हळूहळू आदित्यला रुचाचा स्वभाव समजायला लागला. रुचा आपलं तेच खरं करायची. दरवेळी आदित्यला नमत घ्यावं लागायचं. वल्लभ आदित्यचा जिवलग मित्र होता. तो त्याला नेहमी सांगे की रुचा त्याच्यासाठी योग्य नाही. पण शेवटी म्हणतात ना प्रेम आंधळ असतं. आबांना म्हणजे गोविंद गोखलेंना मात्र आदित्यने या प्रेमाबद्दल काहीही सांगितलं नव्हतं. ना ही  त्याच्या आईला. कारण रुचा त्यांच्या घरातल्यांना कितपत आवडेल हा यक्ष प्रश्न होता. रुचाच्या घरी मात्र आदित्य पसंत होता.

रुचाने स्वतःची प्रॅक्टिस सुरु केली आणि आदित्यने आपली कंपनी जॉईन केली. दोघांचंही प्रचंड बिझी लाईफ सुरु झालं. तरीही ते एकमेकांना वेळ देत. एकमेकांना वेळ देणं म्हणजे मुव्ही, पिकनिक, पार्टी, डिनर-लंच आणि सर्वात महत्वाचं म्हणजे रुचाचे रुसवे फुगवे संभाळण. कधी कधी आदित्यची तारेवरची कसरत व्हायची. आजच बघायचं तर नवीन रिलीज झालेला हॉलीवूड मुव्ही बघायचा प्लान त्या दोघांनी कधीपासून केलेला. तिला तो पाहता यावा यासाठी आदित्यने त्याच्या सर्व महत्वाच्या मिटींग्स कॅन्सल केल्या. त्याने आजचा दिवस रुचासाठी रिजर्व्ह ठेवला होता आणि अगदी ऐनवेळी रुचाने सगळया प्लानवर पाणी ओतलं होतं. आदित्यचा सगळा मुड ऑफ झाला होता. त्याने अशावेळी नेहमीप्रमाणे वल्लभला फोन

केला,

“हॅलो, वल्लू बिझी नसलास तर भेटूया का?”

“काय रे रुचाने मुड बिघडवला वाटतं,” वल्लभ.

“तु भेटतो आहेस की ठेऊ मी?” आदित्य चिडुन म्हणाला.

“ओ.के. हॉटेल वुडलॅंडला ये. मी अर्ध्या तासात पोचतोय,” वल्लभने फोन ठेवला.

हॉटेल वुडलॅंडला नेहमीप्रमाणे गर्दी होती. समुद्राच्या किनाऱ्यावर असलेलं हे हॉटेल आदित्यला आवडत होतं. तसं ते पाण्यातच बांधल होतं. त्यामुळे हॉटेलमधून समुद्राचं निळसर पाणी दिसत असे. जहाजात बसल्यासारखा आभास होई. त्यामुळे आदित्यला ते खुप आवडे. म्हणूनच त्याचा मुड आणायला वल्लभने तिथेच भेटायचं ठरवलं. बरोबर नेहमीच्याच टेबलवर आदित्य बसलेला. टाय सैल करून आणि शर्टाचे हात दुमडून. वल्लभने लांबुनच त्याला ओळखलं. कारण रुचाबरोबर वादावादी झाली की असच व्हायचं. वल्लभने शांतपणे जाऊन आदित्यसमोर बसकण मारली.

“बोला आदि, काय म्हणतोय मुड? परत भांडलास का तिच्याशी?” वल्लभने खाजगीत विचारले.

“वल्लू परत तेच. मी भांडतो का? अरे ऐनवेळी प्लान कॅन्सल केला तिने. आज एवढी महत्वाची काम होती माझी. मी तिच्यासाठी बाजुला ठेवली. कधीकधी मला जाम त्रास होतो यार,”आदित्य कुरकुरत म्हणाला.

“म्हणुनच मी तुला म्हणतो तू ऐकत नाही. रुचा इज नॉट युवर टाईप,” वल्लभ त्याला समजावत म्हणाला.

“अरे ती आवडते रे मला. शी इज माय चॉईस,” आदित्यने सांगितले.

“देन चेंज युवर चॉईस एल्स डोन्ट आर्ग्यु,” वल्लभ ठामपणे म्हणाला.

“हे बघ आदि मला माहित आहे तुला हे पटत नाही पण तुच ॲनालीसीस कर ना. चार वर्ष ही जी तुमची रिलेशनशीप आहे असं जे तू सांगतो आहेसना ती तुझ्याचमुळे आहे. अरे रुचा गर्लफ्रेंड म्हणूनच ओ.के. आहे. लाईफ पार्टनर म्हणुन नाही. तुला तिच्यापेक्षा हजार पटीने

चांगली मुलगी मिळेल. बी प्रॅक्टिकल मॅन."

"वल्लू मला नाही रे जमत. म्हणजे हो तू म्हणतो आहेस ते कळतं मला पण इम्प्लीमेंट करण नाही जमत," आदित्य मान हलवत म्हणाला.

"आबासाहेबांनी उद्या तिला नाही पसंत केली तर? तू काय करणार आहेस?" वल्लभने मुद्द्यालाच हात घातला.

"तोच प्रश्न अलीकडे मला सतावतो. म्हणूनच मी तुला बोलावलं आहे. आई काहीतरी माझ्या लग्नाचं म्हणत होती. आज सकाळीच मी तिला आबांबरोबर बोलताना ऐकलं. मला जरा टेन्शन आलंय," आदित्य म्हणाला.

"हे बघ तुला दोन दगडांवर पाय ठेवता येणार नाही आदी. आबासाहेबांशी बोल आता. रुचाचं काय म्हणणं आहे यावर?" वल्लभने साशंकतेने विचारले.

"तिचा लग्नाचा काही विचार नाही. पण हा लग्नानंतर वेगळं राहायचं म्हणते ती. तिला आबा-आईबरोबर नाही राहायचं," आदित्य हिरमुसून म्हणाला.

"व्हॉट?? तुला.................. तू हे......................... म्हणजे तुझं काय मत आहे यावर?" वल्लभला हे अपेक्षित होतंच तरी त्याला खुप धक्का बसला.

"मी तिला समजावलं रे. मला वेगळं राहणं जमणार नाही," आदित्यने सांगितलं.

"नशीब. पण मला वाटत नाही ती ऐकेलं. आदि लवकर काय तो सोक्ष-मोक्ष लाव. तुझी ना अडकीत्त्यातल्या सुपारीसारखी अवस्था झाली आहे. एकीकडे रुचा आणि दुसरीकडे तुझे आबा-आई," वल्लभला खुप वाईट वाटले. दोघांनी लंच केला आणि ते निघाले. आधीचं काम पुढे ढकलल्याने आदित्यला आता काम नव्हतं आणि त्याचा मुडही नव्हता. घरी जाऊन मस्त झोप काढायचं त्याने ठरवलं आणि कार घराकडे वळवली.

दिवाणखान्यात आदित्यची आई म्हणजे सौ गायत्री गोखले बसल्या होत्या. आदित्यला असं अवेळी बघताच त्यांना आश्चर्य वाटलं. पण त्याच्या उतरलेल्या चेहऱ्याकडे बघून त्या समजल्या की स्वारीचा मुड नाहीये.

"काय रे आदु, मुड गेला वाटतं. बस मी छान वाळयाचं सरबत करून आणते," त्या

म्हणाल्या.

“नको सरबत, तू जरा बस माझ्याजवळ,” आदित्य आईच्या शेजारी बसत म्हणाला.

“काय झालं? ऑफिसमध्ये खुप काम असतं का?” त्याच्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरवत गायत्रीबाई म्हणाल्या.

“म्हणुनच तू आणि तुझे मूड्स सांभाळायला आता कोणीतरी खास व्यक्तीची गरज आहे.”

“म्हणजे? तू आहेसच की,” आदित्यला हसु आलं.

“ अरे मी काय आयुष्यभर पुरणार आहे? तुझा जोडीदारच हे काम करू शकतो,” गायत्रीबाई म्हणाल्या.

जोडीदार म्हंटल्यावर आदित्यच्या डोळ्यासमोर रुचा उभी राहिली. आईला सांगाव का, हो हीच वेळ आहे सांगूया. आदित्यने ठरवले.

“काय रे कसला विचार करतो आहेस? जोडीदार निवडला आहेस का?” गायत्रीबाई मुलाचा चेहरा वाचत म्हणाल्या. शेवटी आई ती आईच म्हणा.

“आई अग तू पण ना! काहीतरीच तुझं,” आदित्यला लाजल्यासारखं झालं.

“काहीतरीच म्हणजे नक्कीच काहीतरी आहे. सांग पाहू मला,” मांडीवर डोक ठेऊन झोपलेल्या आदित्यला हाताने बसवत गायत्रीबाईनी विचारले.

“हो मला एक मुलगी आवडते. तुला मी सांगणारच होतो,” आदित्यने कबुल केले.

“अरे कोण मुलगी? कुठली? काय करते? तिचे आई बाबा कुठे असतात आणि महत्वाचं म्हणजे तिला तू आवडतोस का?” गायत्रीबाईनी आदित्यवर प्रश्नांचा भडीमार केला.

“ अग हो-हो आई एक एक प्रश्न विचार ना. रुचा जोशी. वकील आहे. तिचे वडील म्हणजे श्रीयुत राम जोशी, नाव ऐकलं असशीलच. ते पण वकील आहेत. आम्ही गेली चार वर्ष एकमेकांना ओळखतो. तिलाही मी आवडतो,” आदित्यने एका दमात सगळं सांगून टाकल.

“अरे, चार वर्ष तू एकदाही बोलला नाहीस मला. रुचा आठवली. तुझ्याबरोबर बऱ्याचदा घरी आली आहे तीच ना,” गायत्रीबाईनी विचारलं. खरंतर रुचा त्यांना

आवडायची नाही. कारण ती ज्या ज्या वेळी आली होती त्या त्या वेळी तीचं वागण त्यांना खटकल होतं. पण त्यांनी तसं चेहऱ्यावरून दाखवलं नाही. शेवटी मुलाचं सुख ते आपलं सुख मानणाऱ्या होत्या त्या. पण त्यांना गोविंदरावांची काळजी वाटली. त्याला तसंच कारण होतं. एकतर गोविंदरावांना रुचा आवडण कठीण होतं आणि त्याहून महत्वाचं म्हणजे 'मंजिरी'.

हो गायत्रीबाईंच्या डोळ्यासमोर आदल्या दिवशीचा प्रसंग उभा राहिला. त्या खोलीत दुध घेऊन आल्या. गोविंदराव झोपण्यापूर्वी कायम केशर दुध पीत. वाफाळलेला पेला त्यांनी टेबलवर ठेवला. गोविंदराव वाचनात दंग होते. गायत्रीबाईंची चाहूल लागल्यावर त्यांनी पुस्तक बाजूला ठेवलं आणि डोळ्यावरचा चष्मा काढत ते म्हणाले.

"अहो आपला आदित्य कंपनीत चांगला रुळला आहे. मोठमोठ्या जबाबदारया तो अतिशय चांगल्यारीतीने पार पाडतो. सगळं चांगलं असतानाच त्याचे दोनाचे चार हात करायला हवेत. तुम्हाला काय वाटतं?"

"अगदी माझ्या मनातलं बोललात. मलाही तेच वाटतं. आदुला समजून घेणारी मुलगी या घरात यायला हवी आहे. आदित्य हळवा आहे. भिडस्त स्वभावाचा आहे. बऱ्याचदा मनातलं तो बोलत नाही." गायत्रीबाई काळजीने म्हणाल्या. त्यांच्या हातावर मायेने थोपटत गोविंदराव म्हणाले, "अहो काळजी सोडा, मी आपल्या आदित्यसाठी लाखात एक मुलगी शोधली आहे. माझा बालपणीचा मित्र माधव सहस्त्रबुद्धे, कोकणात असतो. गेल्याच आठवड्यात मुंबईत आलेला. त्याची मुलगी मंजिरी, लहान असतानाच तिला मी आदित्यसाठी पसंत केली होती. अर्थात आता तर माझी खात्रीच झाली. खूप गोड, सुसंस्कारी मुलगी आहे. उत्तम संसार करेल." गोविंदराव हसत म्हणाले.

"मी देवापुढे साखरं ठेऊन येते. आनंदाची बातमी दिलीत. उद्याच मी आदित्यशी बोलते," असं म्हणत गायात्रीबाई उठल्या.

आता त्यांना तेच आठवत होतं. आदित्यने टाळी मारून आईची तंद्री भंग केली. "काय कुठे हरवलीस अग? मी काय विचारतोय?"

"आदी आबांशी बोलायला हवं तुला. कधी बोलणार आहेस ? शक्यतो आजच सांग," गायत्रीबाई काळजीने म्हणाल्या. "काय झालं आई? काही प्रॉब्लेम झालाय का?" आदित्यने न राहवून विचारले.

"अरे तुझ्या आबांना एक मुलगी आवडली आहे तुझ्यासाठी." गायत्रीबाईंनी स्पष्टपणे सांगितले.

"अरे देवा. मला आता लवकरात लवकर आबांशी बोलायला हवं," आदित्यला चिंता वाटायला लागली. कारण त्याला पक्क माहित होतं रुचा आबांना आवडणार नाही. शेवटी हा त्याच्या आयुष्याचा प्रश्न होता. तो आपल्या खोलीत आला आणि त्याने रुचाला फोन लावला.

"हाय जानु. कसा आहेस, आज दिवसभर कामं होती. तुला कॉल करता आला नाही," रुचा म्हणाली.

"रुचा अग जाऊदे ते. मला तुझ्याशी खूप महत्वाचं बोलायचं आहे. मला आबांशी आपल्याबद्दल बोलाव लागेल आजच," आदित्य घाईने म्हणाला.

"अरे काय झालं ? काही घडलयं का ?" रुचा.

"माझ्यासाठी त्यांनी मुलगी बघितली आहे अग," आदित्यने सांगितलं.

"अरे शीट यार. तरी मी तुला सांगितलेलं आपल्याबद्दल सांग घरी. आता काय?" रुचाने विचारले.

"आता आज बोलतो आबांशी. ते लग्नाचं म्हणाले तर मग लवकर करून टाकू," आदित्य.

"व्हॉट करून टाकू? मला एवढ्यात लग्न करायचं नाही मी तुला सांगितलंय. तू कन्विन्स कर त्यांना प्लीज," रुचाने ठामपणे सांगितले. आदित्यचा नाईलाज झाला. त्याने 'बघतो' म्हणून फोन ठेवला. रात्री जेऊन झाल्यावर आदित्य गोविंदरावांच्या खोलीत गेला. त्याला बघताच ते म्हणाले, "ये आदित्य, बस काय म्हणतंय काम. कंपनीत नीट बोलता येत नाही. बरं झालं आलास." गायत्रीबाई तिथेच होत्या.

"आबा मला तुम्हाला काय तरी सांगायचं आहे . खरंतर त्यासाठीच आलोय मी," आदित्य चाचरत म्हणाला.

"हा बोल ना काय झालं?

"आबा मला एक मुलगी आवडते, वकील आहे ती. रुचा जोशी नाव तिच," आदित्यने

कसंबस सांगितलं. गोविंदरावांना हे अनपेक्षित होतं. त्यांनी शांतपणे एकून घेतलं. रुचाबद्दल चौकशी केल्यावर ती ॲड. राम जोशींची मुलगी असल्याचं त्यांना समजलं. ते राम जोशींना चांगलंच ओळखत होते. पैशासाठी वाटेल ते करणारे अशी त्यांची ख्याती होती. त्यांनी रुचाची अधिक माहिती काढायचं ठरवलं. चेहऱ्यावरून ते काहीच बोलले नाहीत.

"उद्या त्या मुलीला घरी घेऊन ये. मला तिला भेटायचं आहे," एवढंच ते म्हणाले. पडत्या फळाची आज्ञा घेऊन आदित्य आबांच्या खोलीतून बाहेर पडला.

मंजिरी सहस्रबुद्धे म्हणजे पांढरपेशे व्यक्तिमत्व असलेले माधव सहस्रबुद्धे यांच्या घरातलं शेंडेफळ. मोठ्या दोन भावांनंतर झाली असल्याने सगळयांची लाडकी. आई-वडिलांच्या गळयातलं ताईत. मोठ्या भावांचा जीव कि प्राण आणि आजीचं सर्वस्व. मंजिरी होतीच तशी. एकदा तिने आपलं मानल कि समोरच्यावर ती आकंठ प्रेम करायची. उत्साहानं सळसळणारा झरा होता तो. मंजिरीला गाण्याची आवड होती. नृत्यही छान करायची. त्यामुळे बी.ए पूर्ण झाल्यावर माधवरावांनी तिला क्लास उघडून दिला. तिथे ती लहान मुलांना गाणं आणि नृत्य शिकवी. काळेभोर दाट लांब केस, वर्ण सावळा, धारधार नाक आणि रेखीव चेहरेपट्टी असलेली मंजिरी कोणाच्याही नजरेत भरायची. लक्ष वेधून घ्यायचे ते तिचे पाणीदार टपोरे डोळे आणि गोड गळा. अशी मंजिरी म्हणजे सर्वांची मंजु खुप लाघवी आणि कोणालाही चटकन आपलंसं करणारी होती. माधवराव जेव्हा गोविंदरावाना भेटले आणि त्यांनी आदित्यसाठी मंजिरीला मागणी घातली तेव्हा भरून पावले. शेवटी कितीही केलं तरी ते बँकेत कारकून म्हणून रिटायर्ड झालेले. गोविंदरावांशी त्यांची बरोबरीच होत नव्हती. मोठ्या भावांनी मंजिरीला चिडवून चिडवून बेजार केलं होतं. शेवटी लाजून ती आपल्या खोलीत गेली दार बंद केलं आणि पांघरुणात शिरून तिने वहीतला आदित्यचा फोटो काढला. तो फोटो बघताच ती पुन्हा लाजली आणि त्या फोटोलाच म्हणाली, “आवडलाय हो तुम्ही मला, पण मी आवडेन का तुम्हाला. तुम्ही अगदी राजपुत्रासारखे आहात.” आपल्या विचारांचं तिला हसू आलं. तिने आरशात स्वतःला पाहिलं. आपल्या केसांची वेणी नीट केली. स्वतःकडे पाहत तिच्या मनात आलं आदित्यसमोर आपण अगदीच सुमार दिसतो. शिक्षण,पैसा,रूप सर्वानीच तो जास्त आहे. मला तो पसंत करेल का? ती आपल्याच विचारात हरवून गेली..

जवळ जवळ एक तास आदित्य रुचाची वाट पाहत बसला होता. शेवटी एकदाची रुचाची कार त्याला दिसली.

“सॉरी हनी, तुला वाट पाहावी लागली. मी कोर्टात होते,”रुचा बसत म्हणाली.

“ओ. के. राहू दे काल मी आबांना सांगितलं आपल्याबद्दल. त्यांना तुला भेटायचे आहे. आजच जाऊया त्यांनी बोलावले आहे,” आदित्य अजीजीने म्हणाला.

“आज? नाही रे जमणार, निदान मला आधी विचारायचं ना. आज खुप कामं आहेत,” रुचा ओठ मुरडत म्हणाली.

“कमॉन हा आपल्या आयुष्याचा प्रश्न आहे. काम पुढे ढकल. मी तुझ्यासाठी कितींदा महत्त्वाची कामे बाजुला सोडली आहेत,” आदित्यने सांगितले.

“अच्छा! म्हणजे आता तू पुनः तोच पाढा वाचणार आहेस का? मला नाही हां जमणार आणि तसंही आयुष्य आपल्याला काढायचे आहे. तुझ्या आबांच्या पसंतीवर ठरणार आहे का सगळं ?” रुचाचा आवाज चढला होता.

“हे बघ उगाच चिडू नको. त्यांनी माझ्यासाठी मुलगी पाहिली आहे. ते आपल्या लग्नाला नाही म्हणणार नाहीत, फक्त आपल्याला त्यांना मान द्यायला हवा. तू अगदी थोडा वेळ काढ प्लिज,” आदित्य नरमाईने म्हणाला. रुचाचा आवाज चढल्यावर त्याला कायम पडत घ्यावं लागे.

“ठीक आहे. चल आपण आत्ताच जाऊया. म्हणजे मग मला ऑफिसला जाता येईल,” रुचा

"या कपड्यांवर? प्लिज साडी नाहीतर ऍटलिस्ट पंजाबी सुट तरी घालना!" आदित्य रुचाला आपदमस्तक न्याहाळत म्हणाला. रुचा धडक कोर्टातून आली होती त्यामुळे तिच्या अंगावर कोर्टातले कपडे होते. त्याच्या या वक्तव्याचा तिला भयंकर राग आला. तिने फक्त रागाने हवेतच हातवारे केले आणि ती उठली.

"लवकर ये चेंज करून मी इथेच तुझी वाट पाहत आहे," आदित्य म्हणाला.

रुचाने फक्त त्याच्याकडे पहिले आणि ती रागातच आपल्या कारच्या दिशेने निघून गेली. आदित्य उगाचच समोर आलेली ऑर्डर चिवडत बसला.

"मंजु ए मंजु," माधवराव आपल्या लेकीला हाक मारत होते.

"काय झालं रे माधवा? ती क्लासला असते आता. येईल दुपारपर्यंत," दिवाणखान्यात बसलेली मंजिरीची आजी म्हणाली.

"आई, अग माझ्या मित्राच्या मुलाचं लग्न आहे मुंबईला. एरव्ही मी जाणार नसतो. पण तुला तर माहीतच आहे आपल्या मंजुची सोयरीक आपण गोखल्यांकडे करतोय. त्या निमित्ताने तिला त्यांच्याकडे घेऊन जातो. तेवढीच ओळख होईल. काय वाटतं तुला? "माधवराव त्यांच्या आईच्या शेजारी बसत म्हणाले.

"छान! चालेलच ना. कधी आहे लग्न? मंजुला माहित आहे का?"आजी.

"तुला आधी बोललोय. येत्या सोमवारी आहे लग्न, उद्याच निघेन म्हणतो,"

माधवराव.

"अरे देवा तयारी कधी करणार मंजिरी? तू पण ना सगळं आयत्यावेळी ठरवतो," आजी कुरकुरल्या.

"तयारीचं काय ग होईल. एवढी माणसं आहेत घरात. तिची वहीनी करेल मदत," माधवराव.

त्यांनी  मोठ्या सुनेला हाक मारली आणि मंजिरीची बॅग भरायला सांगितली.  ते मग मंजिरीच्या आईला म्हणजे सुनंदाबाईंना सांगायला आत निघून गेले.

दुपारी जेवायला मंजिरी घरी आली तेव्हा तिला उद्या निघायचं समजलं. सगळं काही खूप झटपट होतंय असं तिला वाटलं. तिने त्यातल्या त्यात चांगले कपडे घेतले क्लासमध्ये जाउन सगळयांना आठवड्याची सुट्टी दिली. संध्याकाळी तिला खूप थकल्यासारखे वाटले रात्री थोडंस खाऊन ती आपल्या खोलीत आली. खरंतर कामाचं तिला काही वाटायचं नाही पण आज तिच्यावर मानसीक दडपण आलं होतं. तिला आतून वाटत होतं कि काहीतरी घडणार आहे तिच्या आयुष्यात कसली तरी उलथापालथ होणार आहे. खरंतर हे पहिलंच स्थळ होतं त्यामुळे असेल कदाचित पण तिच्या मनाला कसली तरी हुरहुर लागली होती. त्यांनी आपल्याला नकार दिला तर? मिटलेल्या डोळयापुढे विद्याधर आला आणि मंजिरीच्या डोळयांतून टचकन पाणी आले. विद्याधर पटवर्धन मंजिरीच्या कॉलेजमध्ये होता. वर्गातला स्कॉलर विद्यार्थी. विद्याधर सगळयात पुढे असायचा. मंजिरीला तो सिनिअर होता. पहिल्या वर्षाला जेव्हा ती पहिल्या दिवशी कॉलेजमध्ये गेली तेव्हा तो तिला दिसला होता. लायब्ररीमध्ये तो हाताची घडी घालुन सरांबरोबर कसली तरी चर्चा करत होता. तेव्हा मंजिरीला त्याच्याबद्दल काहीच माहित नव्हतं. तिने फक्त त्याला पाहिलं बस्स त्याची मूर्ती तिच्या मनात घर करून गेली. त्यानंतर त्याला रोज पाहण्याची ओढ तिला वाटू लागली. पण तसं प्रत्यक्ष करण्याचा धीर तिला व्हायचा नाही.

खुपदा मनात येऊनही विद्याधरशी बोलायची हिम्मत तिला झालीच नाही. शेवटपर्यंत तीचं प्रेम एकतर्फीच राहील. विद्याधरला याची कल्पना नसावी. मंजिरी त्याच्या खिजगणतीतही नव्हती. तो आपल्याच विश्वात दंग असायचा.

मंजिरीला आजही आठवतो तो विद्याधरचा वर्गातला शेवटचा दिवस म्हणजे सेंडऑफ पार्टी. गेल्या दोन वर्षांत तिने त्याच्याबद्दल सर्व माहिती गोळा केली होती. वर्तमान पत्रात, शाळेच्या स्मरणिकेत, त्याचे छापून आलेले फोटो तिने जमवले होते. त्याने लिहिलेले लेख तिने संग्रहित केले होते. त्याने सोडवलेले पेपर जेव्हा तिच्या वर्गात माहितीसाठी दाखवले तेव्हा तिने त्याच्या प्रति काढुन जपून ठेवल्या होत्या. त्याच्या बारीकसारीक आवडीनिवडीं पासून सर्व काही मंजिरीनें स्वतःच्या आयुष्यात आणले होते. त्याला आवडणारे सर्व पदार्थ तिने शिकून घेतले होते. तिचं आयुष्यच विद्यामय झालं होतं आणि आज त्याचा कॉलेजचा शेवटचा दिवस मंजिरीच्या बालमैत्रिणीला अस्मिताला हे सर्व माहित होतं. तिने मंजिरीला धीर दिला.

“मंजु तुला आता बोललेच पाहिजे. अग कित्ती दिवस तू सगळं मनात ठेवणार आहेस?”

“अस्मि अग मला वाटत नाही त्याच्या मनात काही असेल,” मंजिरी म्हणाली.

“तरी पण एकदा बोल. आयुष्यभर बोललोच नाही म्हणून कुढत बसशील,” अस्मिता खरं बोलली. मंजिरीला ही वाटलं आता सगळं सांगावं त्याला. धीर करावा. तिचा विद्याधरवर खूप जीव होता.

नेहमी प्रमाणे विद्याधर मुलांच्या घोळक्यात होता. तिकडे जाऊन त्याच्याशी बोलायचं मंजिरीचं धाडस होईना. ती त्याच्या गाडीपाशी वाट पाहत थांबली. तीन तास ती तिथेच उभी होती. अचानक समोरून विद्याधर आणि त्याचा मित्र येताना दिसले. इतका वेळ तिने आणलेलं अवसान गळायला लागलं. हृदयाचे वाढलेले ठोके तिला जाणवत होते. हाता

पायांना बारीक कंप सुटला आणि घशाला कोरडं पडली. विद्याधर गाडी जवळ आला आणि त्याचं लक्ष मंजिरीकडे गेलं. तो हसला त्यामुळे मंजिरी ही हसली. तिनेच धीर केला,

"तुम्हाला परीक्षेच्या शुभेच्छा,"

"ओह् थँक्स. तुला ओळखतो मी. मंजिरी सहस्रबुद्धे ना?"विद्याधरने विचारले.

"हो बरोबर. मला तुमच्याशी थोडं बोलायचं होतं,"मंजिरी म्हणाली.

"हा बोल ना काही काम होतं का?"विद्याधरने विचारले. तेवढ्यात त्याचा फोन व्हायब्रेट व्हायला लागला. त्याने फोन उचलला.

"हा बोल ग, हो मी निघतोय. घरीच ये ना! ओके आपण बाहेर भेटू,"विद्याधरने फोन ठेवला पण एकंदरीत त्याच्या बोलण्यावरून मंजिरीला संशय आला.

विद्याधरचा मित्र म्हणाला, "कोण रमा का? मग लग्न कधी करताय?"

"अरे इतक्यात कुठे? वेळ आहे अजून," विद्याधर म्हणाला आणि मंजिरीकडे वळला. परंतु तोपर्यंत मंजिरीला भोवळ आली होती. तिच्या स्वप्नांचा चुराडा झाला होता.

आजही मंजिरीला सर्व जसंच्या तसं आठवत होतं. पण आता ती जखम भरली होती. आदित्यच्या रूपाने ती नवीन आयुष्याला सुरुवात करणार होती. तिने घड्याळात पाहीले. पहाटेचे 4 वाजले होते. तिने घट्ट डोळे मिटले आणि निद्रादेवीची प्रार्थना सुरु केली. हो कारण आज रात्रीच्या ट्रेनने तिला मुंबईला जायचं होतं. मंजिरीच्या डोळयांसमोर आदित्यचा चेहरा आला आणि तिला क्षणार्धात झोप लागली.

आदित्य रुचाला घेऊन घरी आला. रुचाने लेगिंग्स आणि कुर्ता घातला होता. बॉब केलेले केस तिने मोकळेच सोडले होते. तिला दिवाणखान्यात बसवून आदित्य आत आला. त्याने आबांना ती आल्याचं सांगितलं. गोविंदराव आणि गायत्रीबाई दिवाणखान्यात आले. गायत्रीबाईंनी येता येता नोकरांना फराळाचं आणायला सांगितलं. त्यांनी रुचाचं स्वागत केलं. रुचाने फक्त बसून स्मित हास्य केलं. आबांच्या चेहऱ्यावर सूक्ष्म आठी पडली जी बघून आदित्यच्या पोटात गोळा आला. त्याने नजरेनेच रुचाला खाणाखुणा केल्या. त्यामुळे नाईलाजाने रुचा उठली आणि आई आबांच्या पाया पडली.

“तुझ्याबद्दल आदित्यने आम्हाला सांगितलं आहे. तुमचं एकमेकांवर प्रेम आहे,” गायत्रीबाईंनी बोलायला सुरुवात केली.

“हो आम्ही चार वर्ष एकमेकांना ओळखतो. आमच्या घरी आदित्य पसंत आहे,” रुचा मोहक हसत म्हणाली.

“आपण तुमच्या पत्रिका दाखवून घेऊ. मी तुझ्या वडिलांशी बोलतो. सगळं जुळून आलंच आहे तर साखरपुड्याचं ठरवू,” आबा गंभीरपणे म्हणाले. ते एवढ्या चटकन तयार होतील असं त्याला वाटलंच नव्हतं. त्यामुळे त्याला खूप आनंद झाला.

“पत्रिका? आमचा यावर विश्वास नाही. माझी पत्रिका सुद्धा नसेल कदाचित आणि खरंतर मला एवढ्यात लग्नाच्या बंधनात अडकायचे नाही. मी एल एल एमला ॲडमिशन घेतलंय,” रुचाने स्पष्टच सांगितलं. आदित्यला खुपच आश्चर्य वाटलं त्याला रुचाचा भयंकर राग आला. ती एवढी स्पष्ट कशी काय बोलु शकते हेच त्याला समजेना.

गोविंदरावांनी विचार केला जी मुलगी लग्नाला बंधन समजते ती कसा काय संसार करणार? पत्रिकेचा विषय नव्हता कारण ते सुद्धा जुनाट विचारांचे नव्हते. लग्नाची ही त्यांना

घाई नव्हती. परंतु रुचाचं वागणं त्यांना खटकलं. माणसाचा स्वभाव ओळखण्यात त्यांचं आयुष्य गेलं होतं.  त्यांना रुचा खुप उथळ वाटली. परंतु ते काहीच बोलले नाहीत.  प्रसंगावधान राखून गायत्रीबाईंनी पुढाकार घेतला. विषय बदलला पण काही वेळातच गोविंदराव उठून निघून गेले. आदित्य समजायचं ते समजला.

रुचा आणि आदित्य घरातून बाहेर पडले.  आदित्य गप्पच होता रुचाच म्हणाली,

“छान आहे तुझं घर. फक्त मला थोडं जुनाट वातावरण वाटलं. आमच्याकडे खूपच मोकळं वातावरण आहे.”

“रुचा,  अग सगळी घरं सारखी नसतात आणि तू पण ना एवढं स्पष्ट का बोललीस. आपलं म्हणणं वेगळ्या पद्धतीने पण मांडता येत,”आदित्य नाराजीने म्हणाला.

“कसली वेगळी पद्धत?  मला उगाच तिरकस बोलायला आवडत नाही. आहे ते आहे,” रुचा आपलंच घोडं पुढे दामटत म्हणाली.

“अरे हो पण लगेच काही बोहल्यावर चढायला सांगत नाही आहेत. तू पण ना. आबा नाराज झाले पाहिलेस ना?” आदित्य.

“मग मी काय करू?  तुझ्यावर माझं खूप प्रेम आहे. पण म्हणुन मी ॲडजस्टमेंट नाही ना करू शकत,” रुचा म्हणाली. आदित्य यावर गप्प बसला. त्याला राहून राहून आबांच्या निर्णयाचा विचार येत होता रुचाला सोडून तो घरी आला. आबांच्या खोलीत गेला. त्याला त्यांच्याशी बोलायचं होतं.  पण आबा घरी नव्हते. गायत्रीबाई आल्या.

“आई काय म्हणाले ग आबा?” आदित्यने विचारले.

“त्यांना रुचा आवडली नाही. लग्नाचं बंधन वगैरे त्यांना नाही रुचल. हे बघ तू नीट विचार कर. तुझ्या आयुष्याचा प्रश्न आहे,” गायत्रीबाई समजावत म्हणाल्या. आदित्यला वाटलंच

होतं. तो गप्प बसला. आता पुढे काय हा प्रश्नच होता.

तेवढ्यात घरातला फोन खणखणला. गायत्रीबाईंनी उचलला. त्यांना खुप आनंद झाला. त्या उत्साहात बोलत होत्या. आदित्य तिथून जायला उठला. तर गायत्रीबाईंनी त्याला हातानेच बसवलं. त्यांनी फोन ठेवला आणि त्या आदित्यकडे वळल्या.

“आदु मला तुझ्याशी फार महत्वाचं बोलायचं आहे. प्लिज तू शांतपणे ऐकून घे. तू एक अत्यंत समंजस मुलगा आहेस.”

“आई काय झालं? प्लिज मुद्द्यावर ये,” आदित्यने विचारले.

“सहस्त्रबुद्ध्यां कडुन फोन होता. म्हणजे तिच मुलगी जिला तुझ्या आबांनी तुझ्यासाठी पसंत केले आहे. ते उद्या मुंबईत येत आहेत. तू एकदा भेट तिला,” गायत्रीबाई शांतपणे शब्दावर जोर देत म्हणाल्या.

आदित्यला काय करावं सुचेना. रुचा त्याला खुप आवडायची. ही कोण कुठली मुलगी. आबांना आवडली म्हणून काय झालं. आयुष्यभराचा निर्णय घ्यायचा?

“आई अग मला वाटलं होतं. तू माझी मदत करशील,” आदित्य वैतागुन म्हणाला.

“हे बघ तुझ्या आवडत्या मुलीला आबा भेटले ना? आता तू त्यांचं मन राख. मंजिरी नाव तिचं. मी फोटो पाहिला आहे. खूप गोड मुलगी आहे. एकदा भेट तिला,” गायत्रीबाई समजावत म्हणाल्या. आदित्यने मानेनेच होकार दिला आणि तो आपल्या खोलीत आला. अती विचार करून त्याचं डोकं जड झालं होतं. त्याने सरळ मोबाईल सायलेंट केला आणि तो झोपला.

रात्री जेवणाच्या टेबलवर गोविंदराव आदित्यला उद्देशून म्हणाले, “आदित्य, उद्या मंजिरी आणि तिचे वडील येणार आहेत. पुढचा आठवडाभर ते आपल्याबरोबरच असतील.

अतिथी देवो भव! हा गोखल्यांच्या घराचा नियम आहे. बाकी तू सुज्ञ आहेसच,"

"आबा मी काळजी घेईन," आदित्य कसं बसं बोलला.

दुसऱ्या दिवशी आदित्य नेहमी प्रमाणे सकाळी लवकर उठून जिमला निघून गेला. जिम आणि स्विमिंग आटोपून घरी यायला त्याला 7 वाजले. गेटमध्ये आत येऊन त्याने कार पार्क केली आणि त्याला गार्डनमध्ये एक मुलगी दिसली. ती लांब केस मोकळे सोडून उन्हात वाळवत होती. आदित्यला आश्चर्य वाटलं. मंजिरीबद्दल तो विसरूनच गेला होता. ती मुलगी पाठमोरी होती. त्यामुळे आदित्य तिच्या जवळ गेला आणि म्हणाला, "एक्सक्युज मी" ती मंजिरी होती , मंजिरी एकदम बेसावध होती. ती थोडी आडोश्याला उभी होती. एकदम भक्कम पुरुषी आवाजाने ती जास्तच बावरली. तिने मागे वळून पहिले. समोर उभ्या असलेल्या आदित्यला तिने ओळखले. फोटोपेक्षा तो प्रत्यक्षात खूपच सुंदर दिसत होता. का कोण जाणे पण आदित्यला या अनोळख्या मुलीबद्दल खूप आपुलकी वाटली. तिच्या पाणेदार डोळयात क्षणभर त्याला हरवल्यासारखं वाटलं आणि दुसऱ्याच क्षणी तिच्या बोलण्याने तो भानावर आला.

"मी मंजिरी सहस्त्रबुद्धे, नमस्कार"

आदित्यच्या लक्षात आलं कि हीच ती मुलगी. रुचाच्या मानाने मंजिरी खूपच सुमार वाटली त्याला. तो काहीही न बोलता घरात निघून गेला. त्याच्या या कृतीने मंजिरी गोंधळली. त्याने साधे उत्तरही दिलें नाही हे तिला खटकले. पण लगेच सावरत तिने केसांचा अंबाडा घातला आणि ती घरात आली.

मंजिरीला आदित्यचं घर खूपच आवडलं होतं. मोठ्ठा प्रशस्त बंगला होता तो. मुंबई सारख्या गजबजलेल्या महानगरीत एवढा शांत प्रशस्त बंगला म्हणजे दुर्मिळ होता. आदित्यच्या आईचं बंगल्याला नाव दिल होतं' गायत्री सदन!' त्यांच्याकडे एक बुलडॉग होता. त्याचं नाव होतं ब्रुनो. त्याची आणि मंजिरीची खुप छान गट्टी जमली. खरंतर ब्रुनोला आदित्यचीच सवय

होती. तो त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणाकडे जायचा नाही. सर्वजण त्याला घाबरायचे. पण मंजिरीबरोबर आधीचीच ओळख असल्यासारखा तो वागत होता. गायत्रीबाई आणि मंजिरीचं ही छान ट्युनिंग जमल. त्यांना मंजिरी खुप आवडे. त्यांनी मनोमन प्रार्थना केली कि हे लग्न जुळु दे. परंतु आदित्य मंजिरीशी खुप तुटक वागे. तिला असं वाटलं कि आदित्यला आपण आवडलो नसणार परंतु गायत्रीबाईंनी सांगितलं त्याला कामाचा व्याप असतो. त्यामुळे त्याचं असं होतं. शेवटी गायत्रीबाईंनी आदित्यशी बोलायचं ठरवलं.

“आदु तुझं हे काय चाललंय. तू मंजिरीशी एवढा फटकळपणे का वागतोस?”

“आई मग मी काय करू? मला तिच्याशी लग्न करायचं नाही. प्लिज तू समजून घे ना. रुचावर माझं प्रेम आहे,” आदित्य समजावत म्हणाला.

“अरे पण तू साधी मैत्री तर करू शकतोस ना. त्या मुलीच्या मनाचा तरी विचार करना,”

“माझ्या मनाचा कोणीच विचार करत नाही.”

“ओके लग्नाचं जाऊ दे, मंजिरीशी साधं प्रेमाने तरी बोलु शकतोस ना. थोडेच दिवस आहे ती आपल्याकडे,” गायत्रीबाई म्हणाल्या.

“ठीक आहे,” एवढं बोलून आदित्य निघून गेला.

संध्याकाळी जेव्हा आदित्य घरी आला तेव्हा मंजिरी त्याची झोपाळयावर वाट पाहत बसली होती. त्याला पाहताच ती आत जायला लागली. आदित्यलाच कसंतरी वाटलं. त्याने हाक मारली.

“मंजिरी कशी आहेस? आमच्याकडे करमतय ना ?” मंजिरीला खुप आश्चर्य वाटलं आणि आनंदपण झाला.

"हो ब्रुनोबरोबर छान दिवस जातो," ती हसत म्हणाली. आदित्यला बरं वाटलं. तेवढ्यात तिथे गायत्रीबाई आल्या. त्यांनी आदित्यला फर्मान सोडले," आदु मंजिरी दिवसभर कंटाळली आहे. तुम्ही दोघे जरा बाहेर जाऊन या. तिला बरं वाटेल." आदित्यला स्पष्ट नकार द्यायचा होता. कारण तो आता रुचाला भेटायला जाणार होता. पण तेवढ्यात तिकडे मंजिरीचे वडील आले. त्यांच्या समोर आईला नकार देणं त्याला पटेना. तो गप्प बसलेला पाहून गायत्रीबाईंनी मंजिरीला पटकन तयार होऊन यायला सांगितलं.

नेहमीच्या सवयीने आदित्यने गाडी हॉटेल वुडलँडच्या दिशेने घेतली. दोघांना एकमेकांशी काय बोलायचं हा संभ्रम पडला होता. आदित्यला रुचाचा रागीट चेहरा डोळयासमोर दिसत होता. त्याने नुकताच संध्याकाळचा प्लॅन कॅन्सल झाल्याचं तिला टेक्स्ट केलं होतं आणि त्यावर अजून तीचं कसलंही उत्तर नव्हतं. ती घरी येऊन गेल्यापासून दोघांच्यातला संवाद कमी झालेला. आदित्यने रेडिओ ऑन केला आणि त्यावर गीत लागलं,

"का कळेना कोणत्या क्षणी हरवते मन कसे

उमलती कशा धुंद भावना अल्लद वाटे कसे

बंध जुळती हे प्रीतीचे गोड नाते हे जन्मांतरीचे"

आदित्यच्या डोळया समोर रुचा आली आणि मंजिरी मात्र त्या गाण्यात आदित्यबरोबरची भावी स्वप्न शोधु लागली. गाण्याबरोबरच रस्ता संपला आणि ते हॉटेल जवळ आले. आदित्य नेहमीच्या टेबलवर बसला. त्याने ठरवले मंजिरीला आता सगळं खरं सांगायला हवं. तिचं मन गुंतण्या आधी तिला सर्व समजलं पाहिजे.

"छानच आहे हे हॉटेल, मला खुप आवडलं. समुद्रात जहाजासारखं आहे," मंजिरी निरागसपणे म्हणाली. आदित्यला हसु आलं कारण त्यालाही नेहेमी असेच वाटे. त्याच्या या विचारावर रुचा त्याला कायम हसायची. त्याला सगळं आठवलं.

"इथे कसं वाटलं तुला? कोकणातलं वातावरण आणि इथलं यात जमीन अस्मानाचा फरक आहे म्हणा."

"हो पण माझ्या मते घरातली माणसं महत्वाची. ती जर पाठिंबा देणारी असली तर जगाच्या पाठीवर आपण कुठेही तग धरु शकतो," मंजिरी हसून म्हणाली.

आदित्यने तिच्याकडे चमकुन बघितलं. त्याच्यासाठी हे नवीन होतं. त्याला पटलं ते.

"तुला माहिती आहे ना तू इथे कशासाठी आली आहेस ते? आपल्या लग्नाचं चाललंय घरात," आदित्यने विचारले.

"हो मला कल्पना आहे त्याची," मंजिरी संकोचाने म्हणाली.

"मंजिरी मला तुला काही सांगायचं आहे. माझं....." आदित्यचं बोलणं अर्धवट राहील. त्याच्या पाठीवर थाप पडली होती. चमकुन त्याने मागे पाहिलं तर रुचा होती. त्याला काय बोलावं तेच समजेना.

"ग्रेट प्लेजर टु मिट यु हनी. मला वाटलं त्यापेक्षा खुप महत्वाचं काम निघालं तुझं," रुचा कुत्सितपणे म्हणाली.

आदित्यला समजेना ती काय बोलतेय. मंजिरी समोर तमाशा नको म्हणुन तो रुचाला घेऊन बाहेर आला.

"रुचा तू काय बडबडते आहेत वेड्यासारखं?"

"ओह मस्त. ही तीच मुलगी आहे. जी तुझ्या आई-वडिलांनी पसंत केली आहे. बरोबर? कसली बावळट वाटते ती,"रुचा चिडुन म्हणाली.

"हळु बोल प्लिज," आदित्य आत पाहत म्हणाला.

“नक्कीच. मी तुझ्यासाठी आजची संध्याकाळ रिजर्व ठेवली होती आणि तू ऐन वेळी प्लॅन बदलतो. ह्या मुलीसाठी?” रुचा भयंकर चिडली होती.

“हे बघ आईने सांगितलं.  मला नाही म्हणता आलं नाही,” आदित्य तिला समजावत म्हणाला.

“म्हणजे उद्या तुझ्या आईने हिच्याशी लग्न करायला सांगितलं तर करणार आहेस का?” रुचा संतापून म्हणाली.

“कुल डाऊन!  तिला आपल्याबद्दल सांगायला मी इथे आणलं आहे,” आदित्य रुचाला शांत करत म्हणाला.

“हे बघ मला काही माहित नाही.  तुझ्या आई-वडिलांना समजाव. वाटल्यास आपण साखरपुडा करून ठेऊ. लग्नाचं फक्त नको इतक्यात,” रुचा म्हणाली.

“ठीक आहे.  मी घरी बोलतो.  साखरपुडा करून ठेऊ.  लग्न तुला वाटेल तेव्हाच होईल,” आदित्य म्हणाला.

“ए मग ही संध्याकाळ आपण सेलिब्रेट करूया ना प्लिज,” रुचा मधाळपणे म्हणाली.

“अग हो पण मंजिरी आत आहे. तिला काय सांगु?” आदित्य

“त्यात काय एवढं.  तिला टॅक्सीमध्ये दे बसवून आपण मात्र आज मज्जा करूया,” रुचा म्हणाली.

“अग ती नवीन आहे या शहरात,” आदित्य तिला समजावत म्हणाला.

“ए प्लिज हा ती काय लहान आहे का? टॅक्सीत बसव म्हटलं ट्रेनमध्ये नाही,” रुचा म्हणाली.

तसा आदित्यचा नाईलाज झाला. तो आत आला आणि मंजिरीला म्हणाला,

“मला एक महत्वाचं काम आलंय. तुला टॅक्सीत बसवून देतो. जाशील तू?”

“हो चालेल. मी जाईन तुम्ही करा तुमचं काम. फक्त मला कुठे टॅक्सी मिळते ते सांगा,” आदित्य खजील झाला. त्याने मंजिरीसाठी फोनवरून टॅक्सी मागवली आणि तिला बसवलं.

मंजिरी म्हणाली, “ नीट या हं!” आदित्यला तिच्या या वाक्याचं हसु आलं. मनातल्या मनात अशा खेडवळ मुलीबरोबर आयुष्य काढावं लागणार नाही याचं त्याला समाधान वाटलं.

मंजिरी घरी आली. तिला एकटीला पाहून गायत्रीबाईंनी विचारले, “त्यांना काहीतरी महत्वाचं काम आलं. त्यामुळे त्यांनी मला टॅक्सी करून दिली.” गायत्रीबाईंना आदित्यचा राग आला पण त्या गप्प बसल्या.

रुचाबरोबरची संध्याकाळ खुपच मोहमयी गेली. नऊ वाजून गेले तसा आदित्य म्हणाला, “आता निघूया.”

“नऊच वाजाताहेत. थांब ना थोडा वेळ,” त्याच्या खांद्यावर डोकं टेकत रुचा म्हणाली.

“नको निघुया. घरी पाहुणे आहेत,” आदित्य.

“ओके चल. पण साखरपुड्याचं बोल घरी. मला आता धीर धरवत नाही,” रुचा म्हणाली.

आदित्यने तिला जवळ घेतले, “ हो आजच बोलतो.”

रुचाने स्वतःची कार आणली होती. आदित्य आपल्या गाडीकडे आला. त्याने कार

सुरु केली आणि हायवेला आणली. आज स्त्यावर विशेष रहदारी नव्हती. एक ट्रक चालला होता. त्याच्या बाजूला चांगलीच जागा होती. पण पुढे टुव्हीलर होती त्यामुळे आदित्यने विचार केला. हॉर्न वाजवला तर टुव्हिलर वाला पुढे जाईल म्हणजे आपल्याला ट्रकला ओव्हरटेक करता येईल. आदित्यची कार आता ट्रकबरोबर धाऊ लागली. त्याने जोरात हॉर्न वाजवला. तसा टुव्हीलर चालक थोडा पुढे सरकला. इतक्यात कारच्या मागच्या बाजुला ट्रकची हलकी धडक बसली आणि कार त्यामुळे पूर्ण पणे वळून ट्रकच्या समोर आडवी झाली. आदित्यचं अवसान गळून गेलं. ट्रकची पुन्हा एक धडक बसली आणि आदित्यची कार जाऊन बाजुच्या ब्रिजला आपटली. आदित्यच्या डोळयांसमोर अंधारी आली.

सर्व जण जेवणासाठी थांबली होती. आदित्यला खुपच उशीर झालेला. मंजिरी बाहेर राहूनच वाट पाहत होती. का कोणास ठाऊक तिची उजवी पापणी खुप फडफडत होती. जीव घाबरा झाला होता. ती नुसतीच येरझाऱ्या मारत होती. माधवराव आले आणि म्हणाले,

“मंजु अगं चल सगळे जेवायचं म्हणत आहेत. आदित्यरावांना वेळ होईल यायला आणि बहुदा ते जेऊनच येतील.”

“नको बाबा, मला ना कसतरीच होतंय. काही तरी घडलंय असं वाटतंय. सारखा उजवा डोळा फडफडतोय. यांना येऊ दे मग येते मी.”

“मंजु अगं.........”माधवराव पुढचं बोलणार इतक्यात गोविंदराव व गायत्रीबाई आतून घाबऱ्याघुबऱ्या होऊन आल्या.

“माधव अरे आदित्यचा ऍक्सिडंट झालाय. त्याला इस्पितळात नेलंय. आम्ही निघतोय,”गोविंदराव म्हणाले.

मंजिरीला खूपच काळजी वाटली. ती पटकन म्हणाली, “मी पण येते प्लिज मला

येउ द्या,”

“सगळी जण जाऊ,” माधवराव म्हणाले.

सर्व हॉस्पिटलमध्ये आले. तिथे वल्लभ होता. “वल्लभ काय झालं? तू कसा इथे? गोविंदरावांनी विचारलं.

“आबा साहेब देवाच्या कृपेने ऍक्सिडंट झाला तेव्हा मी तिथेच होतो. आदित्य सिरीयस आहे. ऑपरेशन थियेटरमध्ये ऑपरेशन चाललंय,” वल्लभ म्हणाला.

सर्वजण खुप काळजीत होते. गायत्रीबाईंच्या डोळयांमधून नुसत्या पाण्याच्या धारा वाहत होत्या. मंजिरी त्यांना धीर देत होती. खरंतर तिलाही सुचत नव्हतं पण अशा वेळी सर्वांनीच धीर सोडून उपयोग नाही हे तिला माहित होतं. जवळजवळ 12 तासांनी डॉक्टर बाहेर आले. त्यांनी गोविंदरावांना भेटायला सांगितलं. गायत्रीबाईंचा धिरच खचला होता. काय घडलं असेल ते समजेना. गोविंदरावांबरोबर वल्लभ आणि माधवराव पण गेले.

“काय झालं डॉक्टर, आदित्य कसा आहे?” गोविंदरावांनी विचारले.

“गोखले साहेब आदित्यला खुप ठिकाणी फ्रॅक्चर झालंय. पण ठीक आहे. ते घाव कालांतराने भरतात. त्याला घाबरायला नको. हो पण त्याच्या पायांना जबरदस्त मार लागला आहे. सॉरी टु से पण त्यामुळे तो कधी चालु शकेलं असं मला वाटत नाही,” डॉक्टर म्हणाले.

हा धक्का एवढा मोठा होता की पहाडा सारखे भक्कम गोविंदराव सुद्धा ऑक्साबोक्शी रडायला लागले. वल्लभने त्यांना धीर दिला.

“आबासाहेब असं काही होणार नाही आपण मोठे डॉक्टर करू विश्वास ठेवा.”

कोणालाच समजत नव्हतं की गायत्रीबाईंना कसं सांगायच. सर्वजण डॉक्टरांच्या रुम

मधून बाहेर आले."अहो काय म्हणाले डॉक्टर? आपला आदी बरा आहे ना? तुम्ही रडताय का? वल्लभ तू तरी सांग ना?" गायत्रीबाईंनी प्रश्नांचा भडिमार केला.

"काही नाही प्लास्टर पडलय होणार बरं! थोडे दिवस विश्रांती घ्यायला हवी," गोविंदराव कसं बसं बोलले. पण मंजिरीला मात्र ते काही तरी लपवत आहेत हे जाणवलं. तिने तसं चेहऱ्यावर दाखवलं नाही." काका-काकू तुम्ही बाबांबरोबर घरी जाऊन या. मी थांबते इथे. मंजिरी म्हणाली." नाही नको तू एकटी कुठे थांबणार मी थांबतो तुम्ही सगळे जा" गोविंदराव म्हणाले.

"काका, बाबांचं आणि तुमचं ब्लड प्रेशरचं औषध आहे. त्यात तुम्ही तिघांनी काही खाल्लेल नाही. ह्यांना बरं वाटायला आपण सगळे ठणठणीत असणं गरजेचं आहे." मंजिरीने सर्वांना समजावंल आणि घरी पाठवलं.

वल्लभने मंजिरीसाठी कॉफी आणि सँडविज आणली." मंजिरी थोडं खाऊन घे. तू काहीच खाल्ल नाही आहेस."

"वल्लभ भाओजी मला प्लीज सांगा ना आदित्यना खरं काय झालंय ते?" मंजिरीने अखेर मनात सलणारा प्रश्न विचारला.

"मंजिरी अग त्याच्या पायांना जबरदस्त मार लागलाय. त्यामुळे तो कधी चालु शकणार नाही असं डॉक्टर म्हणाले," वल्लभ डोळे पुसत म्हणाला.

"अरे देवा," मंजिरी मटकन खाली बसली. तिला काहीच सुचेना. पण अगदी क्षणभर. ती परत उठून उभी राहिली. वल्लभ तिच्याकडे पाहतच राहिला. तिच्या चेहऱ्यावर निश्चय दिसत होता. मंजिरी प्रत्येक शब्दावर जोर देत म्हणाली, " मी त्यांच्यासाठी वाट्टेल ते करेन. ते नक्की बरे होणार, पूर्वी सारखे चालायला लागणार. माझा देवावर पुर्ण विश्वास आहे."

वल्लभला तिचं कौतुक वाटलं. मंजिरीनें शांतपणे सँडविचेस खाल्ली आणि कॉफी पिल्यावर तिला तरतरी आली. जाऊन तिने तोंडावर पाण्याचा हबका मारला.

मंजिरी बाथरूममध्ये होती तेवढ्यात तिकडे रुचा आणि तिचे डॅडी आले.

“वल्लभ बरं झालं भेटलास ते. मला आत्ताच समजलं आदित्यबद्दल. कसा आहे आता तो? ”रुचाने विचारले. वल्लभने तिला सर्व घटना इत्यंभूत सांगितली. पायाचं ऐकताच रुचा रडायला लागली. पण राम जोशींनी तिला सावरले. ते म्हणाले, “ आदित्यला शुद्धी आली की आम्ही येतो, आता निघतो. काही लागलं तर कळव.” वल्लभ काहीच बोलला नाही. तसं ही त्याला रुचा आधीपासूनच आवडायची नाही. रुचा आणि राम जोशी निघून गेले.

कारमध्ये बसल्यावर रुचा म्हणाली, “ डॅडी आदित्यचं काय झालं हो हे असं? मला खुप वाईट वाटत आहे.”

“हे बघ रुचा मला काही सांगायचं आहे. तू ऐकलंस ना त्याच्या पायांबद्दल तुला काहीतरी निर्णय घ्यायला हवा.”

“हो डॅडी मी तोच विचार करते आहे. एका अपंग मुलाबरोबर मी आयुष्य नाही काढु शकतं. लग्नाच्या बाबतीत माणसाने प्रॅक्टिकल असावं.”

“देअर यु आर. हे हॉस्पिटल एकतर टॉप मोस्ट आहे. डॉक्टर काहीही सांगणार नाहीत. तू या पुढे त्याच्याशी कॉन्टॅक्ट नको ठेऊ. ज्या गावालाच आपल्याला जायचं नाही त्याचा पत्ता का विचारा! ”राम जोशी म्हणाले.

“डॅडी त्याच्याबद्दल मला वाटतं. पण हे शेवटी माझं आयुष्य आहे. या पुढे त्याच्याशी कुठलाच संपर्क मी ठेवणार नाही.” रुचा ठामपणे म्हणाली.

आदित्य शुद्धीवर आला. अर्थात आता पेनकिलर्स मुळे त्याला काही जाणवत नव्हते.

तसेच त्याला काहीही आठवत पण नव्हते. हॉस्पिटल, आजूबाजूला नर्सेस पाहून तो गांगरून गेला. डॉक्टर बाहेर आले आणि आदित्य शुद्धीवर आल्याचं सांगुन गेले.  फक्त दोघांनीच आत जा असं सांगितलं.

सर्व प्रथम गोविंदराव आणि गायत्रीबाई आत गेले.

“आदि कसं वाटतंय बाळा? ”गायत्रीबाईंनी मायेने विचारले.

“आई काय झालं ग हे? मी इथून कधी बाहेर पडणार? ”आदित्य निराशेने म्हणाला.

“हो लवकरच.  सगळं चांगलं होईल बाळा.  धीर धर,” गायत्रीबाई म्हणाल्या.

गोविंदराव आदित्यजवळ नुसते बसून होते. त्यांच्या डोक्यात फक्त एकच घोळत होते की आदित्यच्या पायाचं त्याला कसं सांगायचं! काही तरी तोडगा काढायला हवा होता. ते त्यांच्या मुलासाठी काहीही करायला तयार होते. नर्सने त्या दोघांना बाहेर जायला सांगितलं. खरंतर मंजिरीला आदित्यला पाहायचं होतं. गोविंदरावांनी ते ओळखलं.  इथे आल्यापासून ती कुठेच गेली नव्हती.

“बाळ मंजिरी तू आणि वल्लभ आत जाऊन या,” ते म्हणाले.

मंजिरी आणि वल्लभ आत आले.  आदित्यने त्या दोघांना पाहिले. त्याची नजर रुचाला शोधत होती. वल्लभ ते ओळखुन म्हणाला, “ ती येऊन गेली.” त्याला आदित्यला जास्त त्रास दयायचा नव्हता. आदित्यने मंजिरीकडे पाहिले. मंजिरी म्हणाली,

“ आता लवकर घरी जायचं आहे. डॉक्टर म्हणाले महिन्याभरात तुम्ही कंपनी जॉईन करू शकता.” हे ऐकून आदित्यला बरं वाटलं. शुद्धीवर आल्यापासून त्याला हाच प्रश्न पडलेला कि इथून बाहेर कधी पडता येईल! नर्स आली त्यामुळे मंजिरी आणि वल्लभला बाहेर पडाव लागलं.

मंजिरी कपडे बदलण्यासाठी घरी आली. वल्लभने तिला सोडलं आणि तो आपल्या घरी निघून गेला. मंजिरीनें आंघोळ केली आणि त्यांच्या घरचे अण्णा भटजी यांना फोन केला. अण्णापंत हे कोकणातलं प्रसिद्ध व्यक्तिमत्व! लोक त्यांना देवाप्रमाणे मान देत. त्यांनी आपलं उभं आयुष्य हे देवकार्यात अर्पण केलं होतं. श्रीदत्तगुरूंचे ते भक्त होते. आश्रमामध्येच ते राहत. ब्राह्मचर्याचं तेज त्यांच्या अंगावरून ओसंडुन वाहे.

“हॅलो अण्णा मी मंजिरी सहस्त्रबुद्धे बोलतेय.”

“बोल बाळ मंजिरी. फोन करण्याचं प्रयोजन काय?” अण्णांनी अत्यंत मायेने विचारले. त्यांच्या स्वरात ताकद होती. इतका वेळ कणखरंतेचा बुरखा पांघरलेली मंजिरी हुंदके देऊन रडायला लागली. तिने त्यांना सर्व परिस्थिती कथन केली. अण्णांनी तिला आदित्यची जन्मवेळ, तारीख व जन्मस्थान विचारले. मंजिरीनें आधीच गायत्रीबाईंकडून त्याची पत्रिका घेऊन ठेवली होती. त्यामुळे तिने सर्व आवश्यक गोष्टी सांगितल्या. अण्णापंतांनी प्रश्न कुंडली मांडली. ते मंजिरीला म्हणाले,

“हे बघ मंजिरी आपण खुप जन्माचा प्रवास करून इथवर आलो आहोत. आधीच्या जन्मांत किंवा या जन्मात आतापर्यंत जे आपण चांगलं वाईट केलं आहे ते आपलं प्रारब्ध आहे. चांगल्या कर्माची फळ चांगलीच मिळणार तर वाईट घटना ज्या आपल्या हातून घडल्या आहेत त्या आपल्याला त्याचं फळ देऊन जाणारच. यालाच भोग म्हणतात. आता तू म्हणशील मग देवाचं का करायचं? तर परमेश्वर हा आपल्याला या वाईट काळातून तरून जाण्यासाठी शक्ती देतो. तो आपलं कर्म बदलु शकत नाही. कारण ते आपण केलेलं असतं आणि ‘कर्मफलन्याय’ या नियमा प्रमाणे तो आपल्याला मिळणारा न्याय पण बदलु शकत नाही. फक्त त्याच्या चिंतनाने मिळणाऱ्या शक्तीने आपण परिस्थितीवर नक्कीच मात करू शकतो. आता मी तुला काही उपासना सांगतो. खरंतर आदित्यने या स्वतः केल्या तर फारच उत्तम पण नाही तर त्याची आई अथवा लग्न झालं असल्यास पत्नीने हे केलं तरी चालेल,” एवढं बोलून अण्णा थांबले.

“अण्णा यांच्याबरोबर माझं लग्न ठरलं आहे. मनोमन मी यांना पती स्थानी मानलं आहे. मी ही उपासना केली तर चालेल का? ”मंजिरीनें विचारले.

“ठीक आहे. तसा तुला संकल्प करावा लागेल. ही उपासना ब्रह्ममुहूर्तावर म्हणजे रात्रीच्या चौथ्या प्रहरी केली तर उत्तम होईल. तुला साधारण चार वाजता साधनेला बसावे लागेल. त्यापूर्वी स्नानादी आटोपून शुचिर्भूत हो,” अण्णापंत पुढचा अर्धातास अखंड बोलत होते आणि मंजिरी भक्ति भावाने ऐकत होती. तिने सर्व नीट लिहून घेतले . अण्णांना नमस्कार केला आणि फोन ठेवला. म्हणतात ना, “संगती तशी गती! ”तसेच झाले. मंजिरीला आतून बळ आलं. आता हे शिवधनुष्य पेलण्यासाठी ती सज्ज झाली.

चार पाच दिवसांनी आदित्यला आय.सी.यु. मधुन सेमी आय.सी.यु. मध्ये शिफ्ट केलं. आता त्याला थोडं फ्रेश वाटत होतं. परंतु राहून राहून त्याला प्रश्न पडला होता की आपल्याला पाय का हलवता येत नाहीत? मंजिरी सततच हॉस्पिटलमध्ये होती परंतु रुचाने साधा एक फोनही न केल्याचं आदित्यला फार लागलं होतं. संध्याकाळी डॉक्टर व्हिजिटला आले आणि त्याने मनात घोळणारा प्रश्न विचारला,

“डॉक्टर मला माझे पाय हलवता येत नाहीत. म्हणजे पायातले त्राणच गेल्या सारखं वाटतंय. कशामुळे असेल?” डॉक्टरांनी गोविंदरावांकडे पाहिलं आणि एवढंच म्हणाले, “तुम्हाला विश्रांतीची गरज आहे. औषध अगदी वेळेवर घ्या.”

का कोणास ठाऊक पण आदित्यचं या उत्तराने समाधान झालं नाही. परंतु तो गप्प बसला. औषधांमुळे तो जास्तीत जास्त झोपूनच असे. परंतु इतर रिकामी वेळ मात्र त्याला खायला उठे. अशा वेळी त्याच्या मनात खुप उलट सुलट विचार येत. त्यातच कालपासून त्याला पायांबद्दल शंका यायला लागली होती. डॉक्टर निघून गेले. जाताना दुसऱ्या दिवशी स्पेशल रूममध्ये हलवायचं सांगुन गेले. सर्वांनाच बरं वाटलं.

“आता लवकरच डिस्चार्ज मिळेल बहुतेक,” वल्लभ म्हणाला.

“हो देव करो आणि तसेच होवो,” माधवराव म्हणाले.

मंजिरी विचार करत होती. आज ना उद्या आदित्यला पायांबद्दल कळणार आहे. तेव्हा त्याला काय वाटेल?

दुसऱ्या दिवशी आदित्यला व्हीलचेअर वरून स्पेशल रूममध्ये आणलं. व्हीलचेअरवर बसवताना त्याला अक्षरशः उचलावं लागलं. आदित्य डॉक्टरना विचारू लागला. तो प्रचंड नर्व्हस झाला. त्याला पायांत संवेदनाच जाणवत नव्हत्या. त्यामुळे त्याची खूप चिडचिड झाली. तो कोणाचंच ऐकेना. शेवटी डॉक्टरना येऊन त्याला झोपेचं इंजेक्शन द्यावं लागलं. आदित्यला जाग आली तेव्हा खोलीत फक्त आबा आणि मंजिरी होती. त्याने थंडपणे आबांकडे पहिले. त्या नजरेत प्रचंड निराशा आणि भकास पणा होता.

“मी कधीही चालु शकणार नाहीये ना, आबा?” त्याचा तो प्रश्न गोविंदरावांच्या हृदयात खोलवर रुतत गेला. त्यांच्या डोळयांतून घळाघळा अश्रू यायला लागले. ते डोळे मिटून फक्त हुंदके देत राहिले.

“मला उत्तर मिळालं. हे असं जगून काय फायदा? आबा मला नाही जगायच,” आदित्य त्याच थंडपणे म्हणाला.

इतके दिवस आदित्यबरोबर सतत असणारी मंजिरी शांत होती. त्यांच्यात संभाषणच नव्हतं. आदित्यच्या लेखी ती खोलीतच नव्हती. पण मंजिरीसाठी मात्र तिथे फक्त आदित्य होता. अण्णापंतांशी बोलल्यानंतर तिचं मन पुर्ण शांत झालं होतं. त्यांनी सांगितलेली उपासना तिने अगदी तंतोतंत सुरु केली होती. मंजिरी कणखरं पणे म्हणाली,

“माझा पुर्ण विश्वास आहे चमत्कारावर. तुम्हाला काहीही झालेलं नाही. तुम्ही पूर्वी

सारखे लवकरच कंपनी जॉईन करणार," तिच्या वाक्यात काहीतरी जादु होती. तिच्या स्वरांत कसलीतरी ताकद होती. आदित्य आणि गोविंदराव तिच्याकडे भारावून बघायला लागले. अचानक त्याच श्यामवर्णी मंजिरी विषयी आदित्यच्या मनात अपार आपुलकी दाटून आली. विजेच्या लखलखाटाने क्षणभर जसा अंधार नाहीसा होतो. अवघा परिसर प्रकाशाने उजळुन निघतो आणि त्यांनतर होणाऱ्या गडगडाटाने सर्वांना पावसाची चाहूल लागते. तसं क्षणभर आदित्यचं झालं. पण अर्थातच शेवटी धीर देणारे चार शब्द परिस्थिती बदलत नाहीत. म्हणतात ना, ' जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे' तसंच आदित्यचं झालं. तो ओक्साबोक्शी रडायला लागला. गोविंदराव त्याला फक्त थोपटुच शकले.

आता आदित्यच्या इतर जखमा बऱ्याचशा भरत आल्या होत्या. टाकेपण काढले होते. व्हीलचेअरवर त्याला बसवावे लागे. एरव्ही त्याच्याबरोबर सावली सारखी असणारी मंजिरी अशावेळी तीथुन दुर जाई कारण तिला आदित्यच्या डोळ्यात भकासपणा जाणवे. विशेषतः अशावेळी ती तिथे असली तर त्याची जास्तच चिडचिड होई. हे समजल्यावर मंजिरी त्यावेळीं काहीतरी काम काढून निघून जाई. आदित्य पूर्णतः परस्वाधिन झाल्याने त्याला आंघोळ आणि इतर विधींसाठी मदत करायला वल्लभ असे. वल्लभने खरंच जीवा भावाचा मित्र असल्याचे या प्रसंगातून सिद्ध केले होते. कधीकधी आदित्यची चिडचिड खुप वाढे. अशा वेळी तो वल्लभ आणि मंजिरीवर सगळा राग काढे. तो त्यांना वाटेल ते बोले. पण ती दोघे निमूटपणे ऐकून घेत. एकदा माधवराव गोविदरावांना म्हणाले,

"गोविंद मला वाटतं आदित्यला आपण एखाद्या मानसोपचारतज्ञाला दाखवावं. गैरसमज नको करून घेऊस पण त्याची मानसिक अवस्था पाहता..."

"बरोबर आहे माधव तुझं. मी कालच डॉक्टरांशी बोललो. त्यांनी डॉ.त्रिपाठींबद्दल सांगितलं. ते खुप मोठे मानसोपचारतज्ञ आहेत. आदित्यच्या पायांमुळे ते व्हिजिट करतो

म्हणाले. संध्याकाळी येणार आहेत."

डॉ.त्रिपाठी पंच्याहत्तर वर्षांचे होते. त्यांची नजरच भेदक होती. त्यांच्याकडे पाहिल्यावर ते डॉक्टर नसून संत महंत असल्या सारखे वाटतं. सहा सहा महिने ते हिमालयात जाऊन वास्तव्य करत होते. तासाभरानंतर ते जेव्हा बाहेर आले तेव्हा आदित्य शांतपणे झोपला होता. ते फक्त एवढंच म्हणाले, "त्याच्याशी नॉर्मल माणसा प्रमाणे वागा. तुमच्या वागण्यातून त्याला पायाबद्दल काही जाणवता नये."

त्या दिवसानंतर आदित्य शांत झाला. वेळ मिळेल तेव्हा तो मेडिटेशन करी. काहीतरी लिहीत राही. आठवड्यानंतर त्याला डिसचार्ज मिळाला. सर्वजण घरी आले.

हळूहळू व्हीलचेअर आणि कुबड्यांच्या साहाय्याने आदित्य स्वतःचं स्वतः करायला लागला. या काळात मंजिरीबरोबर त्याची खुप चांगली मैत्री झाली. माधवराव कोकणात निघून गेले. आदित्य बरा होईपर्यंत इथेच मुंबईत राहण्याचा मंजिरीनें निर्णय घेतला. गायत्रीबाईंची ही तशी इच्छा होती. परंतु मंजिरीच्या आईला हे मान्य नव्हतं आणि ते स्वाभाविक होतं. आदित्य कधी बरा होईल याची काहीच खात्री नव्हती. त्यांनी याबद्दल माधवरावांकडे विरोध दर्शवला,

"अहो मंजुला घेऊन यायचं ना तुम्ही! आपण तिच्यासाठी दुसरा मुलगा बघुया. आपल्या लेकीच्या आयुष्याचा प्रश्न आहे."

"सुनंदा तुझं मला पटत. पण मंजु लहान नाही. तिच्या आयुष्याचे निर्णय घ्यायला ती समर्थ आहे. मला एक सांग हे लग्नानंतर झालं असतं तर?"

"पण आता लग्नाआधी झालं आहे ना! आपण आत्ताचं बघायचं."

"हे बघ मंजिरीनें स्वतः हा निर्णय घेतला आहे. तिला आपण एकसंधी देऊ. प्लिज

काही महिने पाहु नंतर निर्णय घेऊ.” शेवटी सुनंदा ताईंचा नाईलाज झाला. मंजिरीच्या इथल्या क्लासमधल्या मुलांना काही काळ क्लास बंद असल्याचं तिच्या मोठ्या भावाने सांगितलं. मुंबईत मंजिरी फावल्या वेळात गायत्रीबाईंच्या मैत्रिणीकडे गाणी शिकवायला जाई. तेवढाच विरंगुळा वाटे. आदित्यला ही घरात बसून राहायचा आता कंटाळा यायला लागला होता. विशेषतः मंजिरी नसली कि त्याला घर खायला उठे. सकाळी नाश्त्या च्या वेळेला तो गोविदरावांना म्हणाला,

“आबा मला आता घरात बसून खूप कंटाळा येतो. आपली कंपनी जॉईन करू का?” सर्वांनाच खुप आनंद झाला.

“अरे मस्तच. कधीही कर. तुझीच कंपनी आहे,” गोविंदराव आनंदाने म्हणाले. दुपारी मंजिरीला काही काम नव्हतं. ती झोपाळयावर बसून विणकाम करत होती. अगदी लहान आवाजात तिने रेडिओ लावला. त्यावर किशोरकुमारची जुनी गाणी लागली होती. शांत वातावरण, आवडता छंद आणि मंद संगीत या सर्वांमुळे तिची तंद्री लागली होती. आदित्य तिथे आल्याचं तिच्या गावीही नव्हतं. एव्हाना त्याचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला होता. आदित्य एकटक मंजिरीकडे पाहत होता. त्याच्या मनात आलं, ‘ह्या मुलीला आपण नाकारून मोठीच चुक केली. त्याचीच कदाचित ही शिक्षा आपल्याला मिळाली. मंजिरी किती चांगली आहे. आजवर ज्या मुलीच्या सौंदर्याला आपण भुललो तिने पडत्या काळात आपल्याला सोडलं आणि या उलट मंजिरी जिचा आपण तिरस्कार केला ती आज आपल्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. देवा तीचं सगळं चांगलं होउ दे.’ खुप वेळ आदित्यच्या मनात असे अनेक विचार थैमान घालत होते. अचानक मंजिरीचं त्याच्याकडे लक्ष गेलं,

“अरेच्चा तुम्ही कधी आलात? ”तिच्या बोलण्याने तो भानावर आला आणि त्याचं त्यालाच ओशाळायला झालं.

“आत्ताच! तुझी तंद्री लागली होती म्हणुन हाक नाही मारली.”

“बसा ना. त्यात काय एवढं तंद्री वगैरे? तसं माझं काही नाही,” मंजिरीनें विणकाम बाजुला ठेवले.

“तुला काय वाटतं मंजिरी? मला पूर्वी सारखं काम जमेल? कंपनी जॉईन करायचं म्हटलंय खरं मी, पण भीती वाटते! ”आदित्य अखेर मनातलं बोलला.

“हे बघा तुम्हाला मी खुपदा सांगते. जे आहे त्याच्याकडे बघा. त्यावर फोकस करा. आपोआपच जे नाही ते अदृश्य होईल. हे जे तुम्हाला अपंगत्व वगैरे वाटतंय असं काहीही नाहीये. डॉक्टर स्वतः म्हणाले आहेत. तुमच्या पायातले फक्त त्राण गेले आहेत. मला विश्वास आहे कि पुन्हा तुम्ही पूर्वी सारखे हिंडु फिरू शकाल आणि त्यासाठी जो आत्मविश्वास गरजेचा आहे तो तुम्हाला कंपनी जॉईन केल्यावरच मिळु शकतो,” मंजिरी आवेशाने म्हणाली.

आदित्यला खुप बरं वाटलं. उत्साहाने तो म्हणाला,

“मंजिरी खरंच तू आहेस म्हणुन मला खुप उभारी येते,” यावर मंजिरी नें फक्त स्मित हास्य केले. तिच्या मनात आलं हे मी माझ्याच माणसासाठी तर करतेय. आदित्यबद्दल पहिल्या दिवशी फोटो पाहिल्यावर आणि मग भेटल्यावर जेवढी ओढ वाटली ती आजही कायम आहे.

आदित्यने दुसऱ्या दिवशी कंपनी जॉईन केली. सर्वांनी त्याचं जंगी स्वागत केलं. पहिल्यांदा त्याला थोडंस अडखळायला झालं. पण मग सगळ्याची सवय झाली. आता त्याचं चांगलंच रुटीन बसलं. जास्तीत जास्त वेळ तो कामात घालावी. त्यामुळे कधी कधी जे नैराश्य त्याला यायचं ते बंद झालं. त्याला तेवढा वेळच नसे मिळत. एकदा वल्लभ त्याला भेटायला आला,

“काय म्हणताय आदित्यराव? आज काल मित्रासाठी वेळ नाही आपल्याकडे.”

“अरे वल्लभ तू पण ना. असं काही नाही. तू माझा फक्त मित्र नाही. सख्ख्या भावापेक्षा मला जास्त आहेस. तू आहेस म्हणून आज मी आहे भावा,” आदित्य भावना विवश झाला.

“अरे बस यार. अब रुलाएगा क्या? बरं माझं सोड. मंजिरी वहिनींना कुठे नेतोस कि नाही?” वल्लभने चिडवत म्हटलं.

“वल्लभ प्लिज. ती तुझी वहिनी नाहीये,”आदित्य गंभीर झाला.

“काय झालं आदि? मंजिरी किती करते तुझ्यासाठी आणि......”

“आणि मी स्वार्थी नाहीये!” आदित्य वल्लभचं वाक्य तोडत म्हणाला, “हे बघ मंजिरी सुशील, सुसंस्कारी आहे. एवढी सुंदर आहे. तिला खुप चांगला मुलगा मिळेल. मला तिला धर्म संकटात नाही पाडायचं. मी हा असा. काही तरीच काय!”

“अरे पण मंजिरीला तू आवडतोस. तिच्या नजरेतून दिसत हे!” वल्लभ मुळ मुद्द्यावर येत म्हणाला.

“ओह मला असं अजिबात वाटत नाही. तिच्यासाठी मीच चांगला मुलगा शोधणार आहे. तिचा सुखी संसार झालेला मला पाहायचा आहे. प्लिज या विषयावर अधिक चर्चा नको,” आदित्यने ठणकावून सांगितले.

“आता काय विषयच संपला. बरं एक मैत्रीण म्हणुन तरी. तिला फिरायला नेतोस का?” वल्लभ

“खरंय तुझं. तिला वेळ देता येत नाही. आजच घेऊन जातो,” असं म्हणत आदित्यने मंजिरीला संध्याकाळसाठी विचारलं. ती आनंदाने तयार झाली.

संध्याकाळी आदित्य आणि मंजिरी 'मेमरेबल' गार्डनमध्ये भेटली. तिथेच लॉनवर जुन्यापद्धतीचे पण आधुनिक सोईचे सुंदर हॉटेल होते. त्यामध्ये संपूर्ण बांधकामं दगड, मातीचे असल्याने आकर्षकपणा वाटायचा. सीफुडसाठी ही जागा बेस्ट होती. घरात खात नसले तरी आदित्यला सीफुड खूप आवडे. पूर्वी रुचाबरोबर बऱ्याचदा तो इथे येत असे. मंजिरी पक्की कोकणस्थ होती. त्यामुळे तिने शाकाहारीच जेवण पसंत केलं. आदित्यला हे माहित नव्हतं. तो म्हणाला,

"अरे आधी तुला विचारायला हवं होतं. व्हेज हॉटेलमध्ये गेलो असतो."

"छे माझं तसं काही नाही. माझ्या मैत्रिणी खाणाऱ्या आहेत. मला सवय आहे."

आदित्यला एकदम रुचाची आठवण झाली. पूर्वी आदित्यही पक्का शाकाहारी होता पण रुचाला आवडे म्हणून तिने त्यालाही मांसाहारी जेवणाची सवय लावली. पण अंड आणि सी फ़ुड एवढंच तो पसंत करी. या दोघींच्या स्वभावात खरंच जमीन अस्मानाचं अंतर आहे. त्याच्या मनात आलं.

"हाय आदित्य कसा आहेस? "इतक्यात कोणीतरी आदित्यला हाक मारली. त्याने समोरच्या व्यक्तीकडे पाहिलं आणि एकदम तो आश्चर्यचकित झाला. रुचा कोणातरी मुलाबरोबर उभी होती. ती नेहमी प्रमाणे सुंदर दिसत होती आणि तिच्या सोबत तसाच राजबिंडा कोणीतरी मुलगा होता. पण आदित्यने लगेचच भावनांवर ताबा मिळवला. "हाय रुचा," एवढंच तो थंडपणे म्हणाला.

"मीट माय फिओंसी अर्जुन, पुढच्या महिन्यात साखरपुडा आहे आमचा. नक्की ये हा!" रुचा हसत म्हणाली. आदित्यने अर्जुनबरोबर हस्तांदोलन केले.

"ओह ग्रेट! अभिनंदन मी नक्कीच येईन," त्याने ही हसून सांगितलं.

"ही कोण? लग्न बिग्न करतोस कि काय?" मंजिरीकडे तुच्छ पणे बघत रुचा म्हणाली. तिच्या त्या नजरेने मंजिरीला वाईट वाटलं. आदित्यला जाणवलं ते.

"मैत्रीण आहे माझी ती.  जिवलग मैत्रीण," प्रत्येक शब्दावर जोर देत तो म्हणाला. त्याच्या अशा बोलण्याने रुचाला इन्सल्टिंग वाटलं.

"असेल, आय डोन्ट केअर. निघते मी," आणि ती निघून गेली. आदित्यला तिच्या वागण्याचं काहीच वाटलं नाही. फक्त या मुलीसाठी मंजिरीसारख्या हिऱ्याला आपण नाकारलं याची जी बोच त्याच्या मनात होती ती तीव्र झाली. त्याच नादात त्याने मंजिरीचा हात हातात घेतला आणि तो मनापासून म्हणाला, " मंजिरी आय एम व्हेरी सॉरी!"

मंजिरीला एकदमच अनपेक्षित होतं. ती गोंधळली. "कशाबद्दल?"

आदित्यला आपली चुक लक्षात आली. त्याने हात सोडला आणि म्हणाला, "सहजच"

"कोण होती ती मुलगी," मंजिरीने कुतूहलाने विचारले.

"अग काही नाही. जुनी ओळख," असं म्हणत आदित्यने विषय बदलला. का कोणास ठाऊक पण मंजिरीला रुचाबद्दल सांगावंसं आदित्यला वाटलं नाही. त्याला भीती वाटली. रुचाबद्दल समजल्यावर मंजिरी कदाचित सोडून गेली तर? आणि मग त्याला आपल्याच विचाराचा राग आला. आपण मंजिरीवर अवलंबुन आहोत. भावनिकरित्या तिच्यात गुंततोय याची त्याला चिड आली. तो गप्प झालेला पाहून मंजिरी म्हणाली,

"मला तुम्हाला काही सांगायचं आहे. मी ज्या अनिता दिदींकडे गाणं शिकवायला जाते त्यांच्याकडे दोन दिवसांपूर्वी एक ज्येष्ठ संगीतकार आले होते.  त्यांनी माझं गाण ऐकलं. त्यांना खुप आवडलं. माझ्या गाण्याचा कार्यक्रम करायचं म्हणत आहेत ते."

"ग्रेट! खुप छान," आदित्यला खुप आनंद झाला. तो उत्साहाने म्हणाला, "हि चांगली

संधी आहे मंजिरी. हे आतापर्यंत मला कसं सुचलं नाही?”

“कारण अजून माझं गाणं तुम्ही ऐकलंच नाहीये,” त्याची फिरकी घेत मंजिरी म्हणाली आणि दोघंही हसायला लागले.

“अच्छा असं आहे तर. ठीक आहे. ह्या वेळी मग मोठाच कार्यक्रम करू. तू तयारीला लाग,” असं म्हणत दोघे कार्यक्रमाच्या प्लॅनिंगमध्ये गढुन गेले.

गुरुपुष्यामृत योगावर मंजिरीचा गाण्याचा कार्यक्रम ठरला. थोडं थोडं म्हणता बरीच आमंत्रण गेली. कंपनी मधली सर्वजण अगत्याने आली. कोकणातूनही घरच्यांनी हजेरी लावली. हॉल प्रेक्षकांनी तुडुंब भरला होता. मंजिरी खोलीमध्ये बसली होती. तिने प्युअर सिल्कची साडी नेसली होती. संपूर्ण वेणी गजऱ्याने आच्छादून टाकली होती. तिच्या वहिनीने तिचा छानसा मेकअप केला होता. नाकात नाजूकशी नथ घातली होती. हातात साडीला मॅचिंग बांगड्या भरल्या होत्या. गळ्यात तिने खास कोल्हापुरी ठुशी घातली होती. तिला गायत्रीबाईंनी ती भेट दिली होती. एखाद्या राजवाड्यातल्या राणीसारखी मंजिरी दिसत होती. ती स्टेजवर आली आणि आदित्य तिच्याकडे भरावल्यासारखा पाहायला लागला.

मंजिरीनें उपस्थित सर्वांना उद्देशून बोलायला सुरुवात केली,

“नमस्कार आज इथे उपस्थित सर्वच मान्यवरांचे मी मनापासून आभार मानते. इथला प्रत्येक श्रोता माझ्यासाठी मान्यवरच आहे. मला ही संधी दिल्याबद्दल मी अनिता दिदींचे विशेष आभार मानते. गुरुवर्यांचे स्मरण करून मी कार्यक्रमाला सुरुवात करते.” असं म्हणुन आणि सर्वांना अभिवादन करून मंजिरीनें गायला सुरुवात केली. सुरुवातीला तिने गणेशस्तवन गायलं. आवाजातील चढउतार, ओलावा सर्व काही अगदी जपत मंजिरी गायली. सर्वांना अगदी गणेशाचाच गाण्यातून आभास झाला. त्यानंतर पुढचे दोन तास मंजिरी जीव ओतून गात होती. समोरचे प्रेक्षक, वातावरण, स्टेज सर्व काही ती विसरली. टाचणी पडेल अशी शांतता होती.

वाद्यवृंद सुद्धा तन्मयतेने एकरूप झाले होते. तिचा स्वर आणि वाद्यांची ताल एकमेकांत मिसळुन गेली होती. सर्वजण धुंद झाले होते. अखेर भैरवी गाऊन मंजिरीनें कार्यक्रमाची सांगता केली. दोन मिनिट कार्यक्रम संपल्याचं कोणाला समजलंच नाही. एवढे सर्व भारावुन गेले होते. मग मात्र टाळयांचा एकच गजर झाला. दहा मिनिटे टाळयाच टाळया वाजत होत्या. मंजिरी आनंदाने बहरून गेली कौतुकाच्या वर्षावाने मोहरून गेली आणि आदित्य, त्याच्या तर मनात अढळस्थान निर्माण करून गेली.

इकडे सर्वजण मंजिरीच्या अभिनंदनासाठी स्टेजमागे गेले होते. मंजिरी प्रत्येकाचे मनापासून आभार मानत होती. एवढ्यात मंजिरीच्या खांद्यावर कोणी तरी हात ठेवला. तिने मागे वळून पहिले आणि तिच्या चेहरीवरचे भावचं बदलले. कारण समोर विद्याधर उभा होता. विद्याधर पटवर्धन! मंजिरीच्या पोटात गोळा आला. असं म्हणतात पाहिलं प्रेम विसरता येत नाही. तिचं हृदय जोरजोरात धडधडायला लागलं. विद्याधर मंजिरीकडे एकटक पहात होता. त्याने तिचा हात हातात घेतला आणि म्हणाला,

“खुप अभिनंदन. मित्राबरोबर आलो होतो तेव्हा तुझं गाणं आहे हे माहित नव्हतं. खरंच खुप छान झाला कार्यक्रम.”

विद्याधर पुनःपुनः अभिनंदन करत होता आणि मंजिरीला काय बोलावं तेच समजत नव्हतं. त्याचवेळी तिकडे आदित्य आणि वल्लभ आले. आदित्य विद्याधरच्या मागे होता त्यामुळे मंजिरीला तो दिसला नाही. परंतु त्याला दोघंही स्पष्ट दिसत होती. मंजिरीनें विद्याधरच्या हातातला आपला हात सोडवून घेतला आणि ती हसली, म्हणाली“ थँक्यू इथे आल्याबद्दल.” विद्याधर काही तरी बोलणार एवढ्यात तिचं लक्ष आदित्यकडे गेलं. ती स्वतः आदित्यकडे गेली. आदित्यच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. तो म्हणाला,

“मंजिरी अग तू कमालच केलीस. केवढी सुंदर गातेस तू! खुप अभिनंदन.”मंजिरीला

बरं वाटलं. याचीच तर ती वाट पाहत होती. वल्लभने ही अभिनंदन केलं. तसा विद्याधर पुनः तिथे गेला. त्याने मंजिरीला आपलं कार्ड दिल आणि म्हणाला, " माझं ऑफीस जवळच आहे मंजिरी. प्लिज, भेटूया परत." मंजिरी गप्प बसली. परंतु आदित्यला विद्याधरच्या स्वरातलं आर्जव समजलं. तो त्याच्याशी हसला तसा मंजिरीचा नाईलाज झाला. तिने ओळख करून दिली,

"हे विद्याधर पटवर्धन. माझ्या कॉलेजमध्ये होते."

"हे वल्लभ माझे मित्र आहेत आणि हे आदित्य आमचं..." खरंतर मंजिरी म्हणणार होती की आमचं लग्न ठरलंय पण ते ओळखुन आदित्य तिला तोडत म्हणाला,

"आमची जुनी मैत्री आहे," मंजिरीला थोडं आश्चर्य वाटलं. वल्लभनेही आदित्यला कोपराने ढकललं.

"ओह अच्छा असं आहे का! आदित्य तुमचा नंबर मिळेल का?" आदित्यने विद्याधरला नंबर दिला आणि त्याचाही घेतला. मंजिरीला परत भेटण्याबद्दल पुनः सांगून विद्याधर निघून गेला.

रात्रभर आदित्यला मंजिरीच दिसत होती. त्यामुळे त्याला नीट झोपच लागली नाही. उठायलाही उशीर झाला. सर्व आटोपायला घड्याळात 10.30 वाजून गेले. ड्रायवरला गाडी काढायला सांगुन तो बाहेर आला. तर उन्हात केस वाळवणारी मंजिरी त्याला दिसली. आदित्यला पाहून तिने हात हलवला. अनामिक ओढीने तो तिच्या जवळ गेला. मंजिरीच्या नुकत्याच धुतलेल्या केसांमधून पाणी गळत होते. आदित्यला वाटलं तिला जवळ घ्यावं आणि सांगावं तिच्यावर आपलं किती प्रेम आहे ते. त्याच्या अश्या बघण्याने मंजिरीला लाजल्यासारखं झालं. तिने त्याच्या डोळयांसमोर चुटकी वाजवली.

“कसला विचार करताय?” आदित्य भानावर आला.

‘मला तू खुप आवडतेस मंजिरी’ हे शब्द आदित्यच्या अगदी तोंडावर आले होते तोच त्याचा मोबाईल वाजायला लागला. स्क्रिनवर विद्याधरचं नाव झळकल. आदित्यने फोन उचलला, “हॅलो आदित्य. मला तुम्हाला भेटायचं आहे. खुप महत्वाचं काम आहे. आज भेटाल का?”

“हो चालेल कंपनीत याल का?” आदित्यने विचारले.

“हो मी येतो. तासाभरात पोचेन चालेल?” विद्याधरने विचारले यावर आदित्यने अनुमती दिली. फोन ठेवल्यावर तो भानावर आला. काखेतल्या कुबड्यांची त्याला आठवण झाली. त्याने मंजीरीकडे पाठ केली आणि तो निघून गेला. मंजिरी त्याच्या या विरुद्ध कृतीने भांबावून गेली. तिला वाईट वाटले.

आदित्यचं विचारचक्र सुरु झालं. कशासाठी विद्याधर भेटणार असेल? त्याचं माझ्याकडे काय काम असेल? तो भेटल्याशिवाय काही अर्थबोध होणार नाही. आदित्यचं कामात लक्ष लागेना. त्याने सेक्रेटरीला फोन लावला,

“दिवाकर, कोणी विद्याधर पटवर्धन आले तर त्यांना लगेच आत पाठव,” बराच वेळाने केबिनच्या दाराबाहेर त्याला विद्याधर दिसला. आदित्यची केबिनच पुर्ण अशी होती की आतून बाहेरचे सर्व दिसे पण बाहेरच्याला याची कल्पना नसे. विद्याधर आत आला. “हॅलो आदित्य. तुम्हाला भेटुन बरं वाटलं.”

“बसा विद्याधर. काय झालं? तुमचं माझ्याकडे काय काम होतं?”

“मला मंजीरीबद्दल बोलायचं आहे,” आदित्यची शंका अचुक ठरली. त्याला वाटलंच होतं.

“हा बोला ना!” तो सावरत म्हणाला.

“आदित्य मी आणि मंजिरी एकाच कॉलेजमध्ये होतो हे तुम्हाला काल ती बोललीच. पण माझ्याबद्दल तिने तुम्हाला आणखी काही सांगितले आहे का?” विद्याधरने अधिरतेने विचारले.

"नाही मला तुमच्याबद्दल ती काहीच बोलली नाही," आदित्य अजूनही अंधारात दगड मारत होता.

"ठीक आहे. मंजिरी मला जुनिअर होती. तिचं माझ्यावर खुप प्रेम होतं. शेवटपर्यंत मी अनभिज्ञच होतो. माझं खरंतर एका मुलीवर प्रेम होतं. ती माझी लांबची नातेवाईक होती. परंतु नंतर तिने मला फसवलं. एका श्रीमंत मुलाबरोबर पैश्यांसाठी तिने लग्न केलं. हल्लीच मला मंजीरीची मैत्रीण अस्मिता भेटली होती. तिच्याकडून मला मंजिरीच्या अबोल प्रितीबद्द्ल समजलं. तेव्हापासून मी तिचा शोध घेतोय. काल खरंतर तिचा गाण्याचा कार्यक्रम आहे हे माहित असल्यानेच मी तिथे आलो होतो. फक्त तिला मी तसं बोललो नाही. कालच्या कार्यक्रमानंतर मला जाणवलं मी तिच्या प्रेमात पडलो आहे. मला ती माझ्या आयुष्यात हवी आहे. प्लीज मला मदत कराल का?" विद्याधर भरभरून बोलत होता आणि आदित्यच्या मनावर आघात होत होते. त्याने पराकाष्टेने स्वतःवर ताबा मिळवला व तो म्हणाला,

"हो नक्कीच. मी तुम्हाला नक्की मदत करेन. मंजीरीशी मी बोलतो या विषयावर. तुम्ही नका काळजी करू."

आदित्यने विद्याधरसाठी कॉफी मागवली.

"थँक्यू सो मच. केवढ हलक वाटतंय मला," विद्याधर आदित्यचे हात हातात घेत म्हणाला. कॉफी पिऊन तो निघून गेला आणि आदित्यने खुर्चीत थकुन मान टाकली. डोळे बंद केले आणि तो स्वतःशीच बोलु लागला.

"विद्याधर मंजिरीसाठी सर्वार्थाने सुयोग्य जोडीदार आहे. मंजिरीला यासाठी तयार करायलाच हवं. आपल्याविषयी तिला वाटणार प्रेम जे तिच्या अनेकदा नजरेत दिसत ते तोडायलाच हवं," आदित्यने मनाशी निर्धार केला.

त्या दिवसापासून त्याचं वागण बदलल. तो मंजिरीला टाळू लागला. या ना त्या कारणाने तो तिच्यापासून दूर पळे. हळूहळू हे मंजिरीच्या लक्षात यायला लागलं. पण तिला याचं कारण समजत नव्हतं. तिने यासंदर्भात वल्लभशी बोलायचं ठरवलं.

"बोल मंजिरी कसं काय भेटायचं ठरवलंस ? परत नवीन कार्यक्रम करते आहेस का?" हॉटेलमध्ये मंजिरीच्या समोर बसलेल्या वल्लभने विचारले. "अहो नाही नाही. खरंतर आदित्यविषयी बोलायचे आहे."

“का? काय झालं?” आदित्यचं नाव काढताच वल्लभ सावरून बसत म्हणाला.

“हल्ली ते माझ्याशी बोलतच नाही, मला टाळतात. माझं काही चुकल असल तर समजतच नाही. काय करू मी ?” मंजिरीच्या डोळयात पाणी आलं.

“माझ्याशी तो काहीच बोलला नाही. अग कामाचा ताण असेल. त्यात त्याच्या पायाचं तुला माहितच आहे. कितीही वरून नाही दाखवलं तरी ते शल्य त्याच्या मनात आहेच आणि रुचाचं लग्न आहे.” वल्लभ पटकन बोलून गेला.

“रुचा कोण?” मंजिरीने चटकन विचारलं. वल्लभचा नाईलाज झाला. तो म्हणाला,

“रुचा जोशी. आदित्यची गर्लफ्रेंड. ते दोघं लग्न करणार होते. पण आदित्यचा ॲक्सीडेंट झाला. त्याच्या पायाचं समजल्यावर तिने त्याच्याशी नात तोडलं,”

“अच्छा. मी भेटले होते तिला. खूप सुंदर दिसते ती.” मंजीरीला हॉटेल मेमरेबल मधला प्रसंग आठवला.

“नुसतीच सुंदर आहे. मी आदित्यला अनेकवेळा तिच्याबद्दल सांगितलं होतं. पण त्यावेळी तो तिच्या प्रेमात आंधळा झाला होता.” वल्लभ रागाने म्हणाला.

“पण मला नाही वाटत कि हे कारण असेल. कारण रुचा भेटल्यावर ते तिच्याशी अगदीच तुटक वागले आणि त्यांच्या चेहऱ्यावरून सुद्धा तसं वाटलं नाही,” मंजिरी मूळ मुद्यावर येत म्हणाली.

“काय समजत नाही, बुवा. मी बोलतो त्याच्याशी तू नको काळजी करू.” वल्लभने तिला आश्वासन दिले.

दुसऱ्या दिवशी मंजिरी नेहमीप्रमाणे क्लासला गेली. क्लासच्या दारातच तिला विद्याधर दिसला. त्याला बघून तिला खूप आश्चर्य वाटलं.

“हाय मंजिरी कशी आहेस ?”

“तुम्ही इथे कसे काय?” मंजिरी.

“अग सहजच इथून जात होतो. म्हंटल तुला भेटाव,” विध्याधर उत्साहाने म्हणाला.

“पण इथला पत्ता कोणी दिला ?” मंजिरीला अजूनही समजेना.

“आदित्यने, मी त्याच्याकडूनच घेतला. चल ना कॉफी पिऊया प्लीज.” मंजिरीला नकार देता येईना. तिने अनिता दीदींना तसा निरोप दिला आणि ती विद्याधरच्या कारकडे आली. विद्याधरने तिच्यासाठी दरवाजा उघडला आणि मग तो स्वतः गाडी चालवायला लागला.

“मला वाटलं होतं तू येशील माझ्या ऑफिसमध्ये मला भेटायला,” कार चालवता चालवता त्याने विचारले.

“नाही म्हणजे जमल नाही. तशी अजून मी नवीनच आहे मुंबईत, रस्ते माहित नाहीत,” मंजिरी खोट बोलली.

“मला एक फोन करायचा, मी आलो असतो,” हॉटेलजवळ कार पार्क करत विद्याधर म्हणाला. यावर मंजिरी गप्प बसली. छानसं टेबल बघून दोघंही बसले. “बाकी कसं चाललंय सध्या? खूप वर्षांनी भेटतोय ना आपण ?” मंजीरीकडे पाहत विद्याधर म्हणाला. “हो खरंय. मस्त चाललंय. मुंबई आवडली आहे मला.” मंजिरी.

“ओह, मस्तच ,अग मुलगा इथलाच पाहणार का?” विद्याधर.

“हो म्हणजे इथलाच. बघू आता,” सुस्कारा सोडत मंजिरी म्हणाली. तेवढ्यात वेटर आला आणि विद्याधरने छानशी ओर्डेर दिली. “हां, काय म्हणत होतीस मंजिरी?” त्याने विचारले.

“काही नाही. तुम्ही बोला ना !”

“ए प्लीज अहो-जाहो नको करूस. आपण एकाच कॉलेजमध्ये होतो. वी आर फ्रेंड्स,” विद्याधरने सांगितले.

“ठीक आहे. तू काय करतोस मग. लग्न केलंस कि नाही,” मंजिरी सेंड ऑफ चा प्रसंग आठवत म्हणाली.

"नाही ग! चांगली मुलगी मिळालीच नाही,"

"पण म्हणजे तुम्ही लग्न करणार होता ना?" ,मंजिरीला आश्चर्य वाटलं.

"हो पण तिला माझ्यापेक्षाही जास्त चांगला मुलगा मिळाला. मला मग सोडलं तिने," विद्याधर थोडासा दु:खी झाला.

"अरे ...." मंजिरीला काय बोलाव तेच समजेना. तिला तिचं पहिलं प्रेम अशा वळणावर भेटत होतं जेव्हा ती ओढ संपली होती. तिला आता विद्याधरबद्दल भावनाच उरल्या नव्हत्या. तिने मनोमन आदित्यलाच आपलं आयुष्य मानलं होतं. कसल्यातरी विचारात गढलेली पाहून विद्याधरने तिला हलवलं. "कसला एवढा विचार करते आहेस?"

"काही नाही सहजच," ती एवढंच म्हणाली.

"लग्नाबद्दल काय ठरवलं आहेस?" विद्याधरने विचारलं.

"बघु अजून काही नाही ठरवलं!" तिच्या अलिप्त बोलण्यावर तो गप्प राहिला. खरंतर आज त्याने तिला मागणी घालायचं ठरवलं होतं. पण का कोण जाणे तिच्या एकदमच अलिप्ततेमुळे त्याने तो निर्णय बदलला. मग ते असंच इकडचं तिकडचं बोलले आणि विद्याधरने तिला घरी सोडलं.

कार मधून मंजिरी उतरली तशी विद्याधरने तिला हाक मारली, "आपण परत भेटलो तर चालेल ?"

"हो चालेल ना! फक्त सध्या मला वेळ नसतो. मी तुला कळवेन," मंजिरीला त्याला तोडायला जीवावर आलं.

"मी वाट पाहीन," असं म्हणून एकमेकांना दोघांनी निरोप दिला.

आदित्य त्याच्या रुमच्या खिडकीतून हे सर्व पाहत होता. त्याला एकदम भरून आलं. त्याने स्वतःला सावरल. मंजिरीला चांगला जोडीदार मिळतोय. आपण तिच्या आयुष्यातून दूर गेल पाहिजे. तेवढ्यात त्याच्या रुमच्या दारावर थाप पडली आणि मंजिरी रुममध्ये आली.

"कसा गेला तुमचा दिवस? खाली समजलं, तुम्ही लवकर आलात ते," मंजिरी हसत

म्हणाली.

"हो!" बस्स एवढंच.

"आज माझा खूपच छान दिवस गेला," खरंतर मंजिरीला सकाळी एका सिरीअलचं टायटल सॉंग म्हणायची ऑफर आली होती. त्यामुळे ती विशेष खुश होती. तर आदित्यला वाटलं ती विद्याधरमुळे खुश आहे.

"हे पेढे घ्या ना?" तिने त्याच्या समोर पेढ्यांचा बॉक्स धरला.

"अरे वा लग्न ठरल का?" आदित्यने पटकन विचारले.

"लग्न? म्हणजे?" मंजिरीला कसलाच अर्थबोध लागेना.

"मगाशी विद्याधरला पाहिलं म्हणून...." आदित्य गप्प बसला. मंजिरीला हे अपेक्षित नव्हतं. तिला एकदम खूप राग आला. तिने हातातला पेढ्यांचा बॉक्स टेबलवर ठेवला आणि ती निघून गेली. असं म्हणतात रागावर सर्वोत्तम उपाय म्हणजे त्याक्षणी तिथून दूर जाणे. असं नाही केलं तर रागाचा स्फोट होण्याची आणि परिणामी समोरची व्यक्ती दुरावण्याची शक्यता जास्त असते. म्हणूनच मंजिरीने हा उपाय योजला. ती आपल्या खोलीत आली. तिचे डोळे पाण्याने भरले. तिच्या मनात आलं.,

"काय नाही केलं आपण आदित्यसाठी. पण त्याने एवढं बोलताना आपल्या मनाचा जराही विचार केला नाही ! सरळ तो विद्याधरशी आपलं नात जोडून मोकळं झाला? का राहतोय आपण इथे ? त्याच्यासाठीच ना. बस्स त्याला आपल्याबद्दल काही वाटत नाही तर आपण तरी का एवढा प्रयत्न करतोय?" तिचं मन आक्रांदायला लागलं. खूप वेळ तिचे हुंदके येतच होते.

मंजिरी एकदम निघून गेल्यावर आदित्यलाही चुकल्यासारखं वाटायला लागलं. खुपवेळ तो शून्यात बघत होता. बराच वेळ गेला असेल अचानक त्याच्या खोलीतला लाईट लागला. खोली प्रकाशाने लक्ख उजळून निघाली. त्याने डोळे किलकिले करून पहिले तर गायात्रीबाई होत्या. "काय रे असा अंधारात का बसला आहेस ? कितीवेळ मी तुला हाक मारत होते. मला वाटलं झोपला असशील."

"नाही अग आई. असाच बसलो होतो. अंधार पडल्याचं समजलंच नाही," आदित्य

गप्पगप्पच होता.

"अरे एवढा कसला विचार करत होता?," गायत्रीबाईनी मायेने विचारल.

"तू कशाला हाक मारत होतीस?" आदित्यने विषय बदलला.

"अरे शिरा बनवलाय खायला बोलवायला हाक मारत होते."

"अरे वा ! आज संध्याकाळी नाश्त्याला शिरा ? , बऱ्याच दिवसांनी मी संध्याकाळी नाश्ता अटेंड करतोय. नाहीतर रोज जेवायलाच येतो मी," आदित्य हसत म्हणाला.

"होय रे ! ते आहेच आणि आज आपल्या मंजिरीने मस्त आनंदाची बातमी आणली आहे ना...."गायात्रीबाई म्हणाल्या.

"मंजिरीचं काय? कसली बातमी?" आदित्यने त्यांना तोडत विचारले.

"अरे तुला बोलली नाही ? मगाशी पेढे देते म्हणाली होती."

"काय पण?" आदित्यला समजेना.

"तिला सिरीअलचं टायटल सॉंग गायची ऑफर आली आहे. नवीन सिरिअल सुरु होणार आहे. मराठी चॅनेलवर," गायात्रीबाईनी सांगितले. आदित्यच्या डोक्यात प्रकाश पडला. त्याला स्वत:चाच राग आला. त्याने मंजिरीला दुखावले होते.

मंजिरी डायनिंग हॉंलला आलीच नाही आणि आदित्यला शिरा गोड लागलाच नाही. त्यानंतर आदित्यला मंजिरीला सॉरी कसं म्हणाव तेच समजत नव्हतं आणि मंजीरीही त्याचाशी बोलत नव्हती. दरम्यान विद्याधरने मंजीरीशी संपर्क कारण्याचा प्रयत्न केला. पण तिने प्रतिसादच नाही दिला. शेवटी तो तिला भेटायला तिच्या क्लासमध्ये गेला. "मंजिरी अग किती दिवस तुला फोन कारतोय?"

"मी जरा गडबडीत होते," मंजिरी

"ओके ! कॉफी पिऊया का ?"

"आज नको थोडी कामे आहेत."

"प्लीज थोडा वेळ, मी तुला परत क्लासला आणून सोडतो," विद्याधर आर्जवी

स्वरात म्हणाला. तसा मंजिरीचा नाईलाज झाला. ती दोघं जवळच्या कॉफी शॉपमध्ये आली. आज काय ते स्पष्ट बोलायचं मंजिरीने ठरवलं.

“बरं झालं विद्याधर मला पण बोलायचं आहे तुमच्याशी,” मंजिरीने सुरवात केली.

“वा छान हे मी भेटायला आल्यावर सांगतेस का?” विद्याधरने विचारले.

“नाही. तसं नाही. फक्त सुरवात कशी करायची तेच समजत नाहीये.” मंजिरीला अवघडल्यासारखं झालं.

“ठीक आहे. मग मी सुरवात करतो. लग्नाचं काय ठरवलं आहेस?” विद्याधरने स्पष्टच विचारलं.

“हे बघ विद्याधर तू समजतोस तसं आता माझ्या मनात काही नाही. नो डाउट तू मला खूप आवडायचास. माझं खूप प्रेम होतं तुझ्यावर. पण ते तसं वय होतं. ती भावना नाही. मंजिरी भराभर बोलत होती. विद्याधर शांतपणे ऐकत होता. अखेर त्याने तिच्या हातावर हात ठेवला. मंजिरीला आश्चर्य वाटलं पण विद्याधर जे बोलला त्याचा काहीवेळ तिला अर्थबोध होईना. कारण विद्याधर म्हणाला, “मी आदित्याविषयी बोलतोय!”

“काय ? मला नाही समजलं.”

“तुला आदित्य आवडतो ना? मग?” विद्याधरने विचारलं. मंजिरीला काय बोलावं तेच समजेना. ती सुन्न झाली. विद्याधर शांतपणे तिच्या उत्तराची वाट पाहत होता.

“होय मला आवडतात ते. खूप जास्त आवडतात. पण त्यांना काहीच वाटत नाही माझ्याबद्दल. तेच दुःख आहे,” मंजिरीचे डोळे पाणावले. तिला खूप त्रास होत होता.

“तू याविषयी त्याच्याशी बोलली आहेस का?”

“सगळ्याच गोष्टी बोलाव्या लागतात का? भावना, डोळे याला काहीच महत्व नाही? त्यांना अजूनही ती रुचा आवडते. मंजिरीने डोळे पुसले.

“कोण रुचा?” विद्याधरला समजलं नाही.

“त्यांची मैत्रीण आहे. त्याचं एकमेकांवर प्रेम होतं,” मंजिरीने रुचाबद्दल तिला माहित असलेलं सर्व सांगितलं. का कोणास ठाऊक पण आता विद्याधर तिला जवळचा वाटत होता. एक

खूप चांगला मित्र ज्याच्याबरोबर ती सर्व काही बोलू शकत होती.

"मला नाही वाटत कि आदित्यचं अजूनही रुचावर प्रेम असेल असं ?" विद्याधरने सर्व ऐकल्यावर सांगितलं.

"खरंतर मलाही नाही वाटत. पण त्याचं माझ्याशी हे असं फटकून वागण. यावरून हे नक्की सिद्ध होतं कि त्याचं माझ्यावर प्रेम नाही," मंजिरीला पुन्हा हुंदका आला. परंतू विद्याधरला मात्र हे कोड सोडवावं असं वाटत होतं. त्याला मंजिरीसाठी काहीतरी करायचं होतं. तो गप्प राहिला. तो विषय तसाच अर्धवट राहिला.

दुसऱ्याच दिवशी विद्याधर वल्लभला भेटला. त्याने मंजिरीकडून वल्लभची माहिती काढली होती. अर्थातच वल्लभने त्याला ओळखले नाही.

"मंजिरी सहस्त्रबुद्धेच्या कार्यक्रमात आपण भेटलो होतो," विद्याधरने आठवण करून दिली.

"ओह येस आठवलं. पण म्हणजे....." वल्लभला त्याचं भेटण्याचं प्रयोजन समजेना.

"बरोबर तुला हा प्रश्न पडला असेल कि मी इथे का आलोय !" विद्याधर.

"हो म्हणजे मला समजत नाहीये...."

"सांगतो मी इथे आदित्य आणि मंजिरीविषयी बोलायला आलो आहे." विद्याधरने सरळच सांगितले.

"मंजिरी काही बोलली का तुला," वल्लभ अंदाज बांधू लागला.

"मंजिरीचं खूप प्रेम आहे रे आदित्यवर," विद्याधर म्हणाला.

"माहिती आहे मला. तिच्या कृतीतून जाणवतं ते," वल्लभ कॉफीचा घोट घेत म्हणाला.

"पण मग आदित्यला हे जाणवत नाही? अरे मंजिरी लाखात एक मुलगी आहे. आदित्यच्या पायाचं माहित असूनही ती त्याचा प्रेमाने स्वीकार करतेय. अशी मुलगी शोधूनही सापडणार नाही रे. मी कर्मदरिद्री आहे तिचं प्रेम नाही समजू शकलो. आयुष्यभर माझ्या मनाला हे सल बोचत राहणार." विद्याधर आर्त स्वरात म्हणाला. त्याचा आवाज कातर झाला होता.

वल्लभने त्याला थोपटल.

"मी समजू शकतो विद्याधर. पण आदित्य असा वागतो याला त्याच्या दृष्टीने समर्पक कारण आहे," वल्लभ शांतपणे म्हणाला. "मला नाही समजलं."

"आदित्यचं अपंगत्व. त्याला या परिस्थितीत मंजिरीला स्वीकारावं म्हणजे स्वार्थ वाटतं. त्याला तिच्या आयुष्याचं मातेरं नाही करायचं. समजतंय ना तुला?" वल्लभने विद्याधरकडे अपेक्षेने पाहिलं.

आता विद्याधरला मंजिरीच्या बोलण्याचा अर्थ बोध झाला. त्याच्या मनातला आदित्यविषयीचा राग गेला आणि त्याची जागा आपुलकीने घेतली. त्याला वाटलं, आजवर आपण फक्त स्वार्थाचा विचार केला. आज रमा आपल्या आयुष्यात्त असती तर मंजिरीविषयी आपल्याला काही वाटलं असतं? खरंतर कॉलेजला असतानाच आपल्याला माहित होतं मंजिरीचं आपल्यावर प्रेम आहे ते. पण आपल्याला रमा उजवी वाटली. सावळी मंजिरी आपल्याला आवडायची नाही. आपल्याला खात्री होती ती कधीच आपल्यापर्यंत येणार नाही.त्यामुळे आपण निश्चिंत होतो. सेंड ऑफच्या दिवशी तिला आपल्याशी प्रथमच बोलताना पाहिलं. तिच्या चेहऱ्यावरचे भाव बघून आपण ओळखलं होतं आणि मग आपण फोनवरच्या बोलण्याचं नाटक केलं. मित्रानेही आपल्याला सांभाळून घेतलं आणि मग तो मंजिरीच्या गायनाचा प्रोग्राम. सहज म्हणून गेलो होतो आपण. आपल्याला ती व्यक्ती मंजिरी असेल असं वाटलंच नव्हतं. आपण तिला पाहिलं आणि तिचं होणार कौतुक, भव्य कार्यक्रम, तिचा मान या सर्वांनी आपले डोळे उघडले. खोट बोललो आपण, विद्याधरला सर्व आठवलं. स्वतःच्या खोटेपणापेक्षा त्याला आदित्यच्या मनाचा खरेपणा भावला. पण आपल्या चुकीच्या कृतीचं कोणतच समर्थन त्याच्याकडे नव्हतं. त्याला फक्त एवढंच वाटत होतं कि आदित्य-मंजिरी एकत्र यावीत आणि आता आदित्यविषयी ऐकल्यावर हि भावना अधिक तीव्र झाली होती.

"कसला विचार करतो आहेस?" वल्लभने विद्याधरची तंद्री मोडली.

"मंजिरीला हे सर्व समजायला हवं रे. आदित्य बरा व्हायला हवा. आपण काहीतरी करूया." विद्याधर तळमळीने म्हणाला.

"मला पण असंच वाटतं. पण विचार करून माझ्या डोक्याचा भुगा झालाय. आदित्य माझा फक्त मित्र नाही. मी भाऊच मानतो त्याला. त्याच्यासाठी मी कितीतरी डॉक्टर्सकडे गेलो.

पण.....” वल्लभ निराश झाला होता.

“डॉक्टर काय म्हणतात? यावर काहीच इलाज नाही ? असं नाही होणार. काहीतरी असेल,” विद्याधर वल्लभला हलवत म्हणाला. “हो आहे ना. डॉक्टर म्हणतात आपलं अंतरमन हे काहीही करू शकत. त्याच्यात संपूर्ण विश्वाला सामाऊन घ्यायची ताकद असते. आदित्यला स्वतःला वाटलं पाहिजे. त्याच्या मनावर काहीतरी जबरदस्त आघात व्हायला पाहिजे. तीव्र इच्छाशक्तीच काहीही करू शकते. असं झालं तरच तो चालू शकतो,” वल्लभने सांगितले. विद्याधर विचारमग्न झाला. त्याने काहीही न बोलता वल्लभचा निरोप घेतला. पण तीव्र इच्छाशक्ती, जबरदस्त आघात हे शब्द त्याच्या डोक्यात घुमत राहिले.

मंजिरीने टायटल सॉंग गायचं काम स्वीकाराल. सिरिअल रिलीज होण्यापूर्वीच त्या शीर्षक गीताने चांगलीच प्रसिद्धी मिळवली. मंजिरीला अगदी अस्मान ठेंगण झालं. तिने घरातच छोटीशी पार्टी ठेवली. मंजिरीच्या भाच्याची तब्येत बिघडल्याने कोकणातून कोणाला यायला जमलं नाही. पण सर्वांनी आशीर्वाद दिले. वल्लभ आला. आदित्यने मंजिरीचं मनापासून अभिनंदन केलं. गायत्रीबाईनी तिला सोन्याचे तोडे बक्षीस म्हणून दिले. खरंतर ते आदित्यनेच घेतले होते पण त्याने आईला पुढे केलं. विद्याधरपण आला. सर्वजण जेवायला टेबलवर बसली होती. मंजिरी तिथेच टोमॅटो कापत होती. सर्वजण हसत होती त्यामुळे तीच लक्ष नव्हतं आणि गडबडीत बोट कापल. रक्ताची धार लागली. मंजिरीच्या तोंडातून, “आई ग” असे शब्द निघाले . आदित्यचं तिच्याकडेच लक्ष होतं. तिच्या बोटातून गळणार रक्त बघून त्याचा जीव कासावीस झाला. तो धडपडत कुबड्या घेऊन उठला आणि भराभरा तिच्यापर्यंत गेला.

“समजत नाही तुला. अशी कशी वेंधळी तू?” असं म्हणून त्याने तीचं बोट पटकन आपल्या तोंडात पकडलं. सर्वजण त्याच्या या कृतीने आश्चर्यचकित झाले. मंजिरीला लाजल्यासारखं झालं. तेवढ्यात नोकर “फस्ट एड बॉक्स’ घेऊन आला आणि आदित्यने स्वतः तिचं ड्रेसिंग केलं. मंजिरीला त्याच्या या कृतीने खूप आनंद झाला.

विद्याधर गायत्रीबाईना म्हणाला, काकु रत्नागिरीला माझा मामा राहतो. मी जाणारच आहे तर तुम्हीपण सगळे चला ना. तेवढाच जरा बदल होईल.”

“वा चांगली कल्पना आहे. तेवढंच आदित्यला वेगळं वातावरण. पण मुलानो तुम्ही सगळे जा. तुम्ही जास्त धमाल कराल,” गायत्रीबाई म्हणाल्या.

“आई अग कुठे फिरायला. मला नाही झेपणार प्रवास,” आदित्य म्हणाला.

“ए चल ना आदी. आता तू नाही आलास तर आम्ही कोणीच जाणार नाही.” वल्लभने सांगितले. शेवटी सगळयांच्याच म्हणण्याने आदित्य तयार झाला.

सर्वांची जेवण झाली आणि मंजिरी आपल्या खोलीत झोपायला आली. राहून राहून तिच्या मनात संध्याकाळचा प्रसंग येत होता. खरंच आदित्यला आपण आवडत असु का? इकडे बिछान्यावर पडल्यावर आदित्यलाही सर्व आठवलं. त्याला स्वत:च्याच कृतीचं आश्चर्य वाटत होतं. असं कसं झालं आपल्या हातून? मंजिरीला काय वाटलं असेल? आपण असं करायलाच नको होतं ? का वागलो आपण अस? आदित्यने उद्वेगाने स्वतःलाच प्रश्न केला आणि खोल आतून उत्तर आलं, “अरे वेड्या कारण मंजिरीवर तुझं जीवापाड प्रेम आहे. तिला इजा झालेली तुला सहन झाली नाही.” आदित्य या उत्तराने अधिक त्रासिक झाला कारण सत्य हे कटू असतं. तो स्वतःशीच बोलु लागला. “हो आपलं मंजिरीवर प्रेम आहे. तिच्याशिवाय आपण जगूच शकत नाही. परंतू आपल्याला हे करायलाच हवं. आपल्यासारखा अपंग मुलगा मंजिरीसारख्या रत्नाच्या आयुष्यात नको. आता विद्याधरच्या गावी गेलो कि आपणच पुढाकार घ्यायचा दोघांच्या लग्नासाठी.” आदित्यने असा निश्चय केला आणि त्याच्या मनाची घालमेल थांबली. त्याला शांत झोप लागली.

पावसाळ्याचे दिवस होते. जून महिना असल्याने गडगडाटी वादळी पाऊस! अशा पावसात सर्वांनी फिरायला जायचं ठरवलं. तेही रत्नागिरीला म्हणजे पावसाचं माहेरघर. विध्याधर, वल्लभ, आदित्य,मंजिरी आणि लीना म्हणजे वल्लभची मैत्रीण. मंजिरीला सोबत म्हणून वल्लभने तिला यायला सांगितलं. पहाटे चारला सर्वजण रत्नागिरीला पोहचले. सर्वत्र हिरवळ, नुकतीच सर येऊन गेल्याने मातीचा पसरलेला गंध. मंजिरीला घरी आल्यासारखं वाटलं. तिच्या मनात आतून एकदम वाटलं कि काहीतरी खुप चांगलं घडणार आहे. सर्वजण दमली होती आणि विद्याधरच्या मामाचं घर खूपच मोठ होतं. सगळयांनी विश्रांती करायचं ठरवलं पण ब्रम्ह्मुहुर्त असल्याने मंजिरीने आंघोळ केली आणि ती साधनेला बसली. अण्णापंतानी सांगितल्याप्रमाणे तिची साधना पूर्ण झाली होती. तिने मनोमन प्रार्थना केली कि

आदित्य पूर्ण बरा होऊ देत. तो पूर्वीसारखा हिंडू फिरू लागु दे. तिला मग खूप बरं वाटलं. काहीतरी खूप चांगलं होणार ही तिच्या मनातली भावना प्रबळ झाली.

घडाळयात आठ वाजले  एक एक करत सर्वजण उठले. चहा-नाश्ता, अंघोळी आटोपल्यावर सर्वांनी बाहेर फिरायला जायची टूम काढली. दोन गाड्या तयार झाल्या. एका गाडीत मामा,मामी,वल्लभ आणि लीना. दुसऱ्या गाडीत आदित्य, मंजिरी आणि विद्याधर. मामा आणि विद्याधरला सर्व रस्ते माहित असल्याने त्यांनीच गाडी चालवण पसंत केलं. सर्वजण प्रथम गणपतीपुळ्याला गेली. दर्शन झाल्यावर समुद्रावर फेरफटका झाला. आदित्य जास्तीतजास्त मंदिरापासून दूर रहात होता. मंजिरीने साडी नेसली होती. केसांची सैलसर वेणी घातली होती. खुप गोड दिसत होती ती. दिवसभर सर्वांनी धमाल केली. आदित्यची दमछाक झाली होती. नाही म्हंटल तरी कुबड्यांचा त्याला त्रास होई. त्याच्या चेहऱ्यावरची थकावट पाहून मंजिरीच्या पोटात कालवाकालव झाली. संध्याकाळचे सहा वाजले होते. आभाळही भरून आलं होतं. मंजिरी म्हणाली, “मामा आपण निघूया का? पावसाचं वातावरण  दिसतय. पोचायला अजून वेळ लागेल.”

“हो मला पण असच वाटतं. वाटल्यास आपण उद्या येऊ.” मामी म्हणाल्या. सर्वांनी आवरत घेतलं आणि सर्वजण गाड्यांमध्ये येऊन बसले. मामांच्या गाडीमागे काही अंतर ठेऊन विद्याधर गाडी चालवत होता. अचानक त्याला फोन आला. “हा बोल रे. हो आत्ता गणपतीपुळे सुटतंय. नाही रे उशीर होईल मी उद्या भेटतो तुला. अरे पण....बरं अगदी थोडावेळ,” असं म्हणून त्याने फोन ठेवला. आदित्य त्याच्या बाजूलाच बसला होता.

“काय रे काय झालं?” आदित्यने विचारले.

“अरे माझा मित्र, इथे जवळच राहतो. तो भेटायचं म्हणतोय काय करू?” विद्याधरने सांगितले. खरंतर आदित्यला आता झोप येत होती. पण त्याला तसं सांगण प्रशस्त वाटेना.

“भेटूया ना. त्याच्या घरी जायचं का?” त्याने विचारले.

“नाही रे तो वाटेत येणार आहे. मी फक्त मामांना सांगतो तुम्ही पुढे व्हा,” असं म्हणून विद्याधरने लगेच मामांना कळवलं. मित्राबरोबर बोलल्यावर त्याने एका आड बाजूला आणून गाडी पार्क केली. एकदमच निर्मनुष्य बाजू होती. सात वाजून गेलेले त्यामुळे चांगलाच अंधार पडला होता. मंजिरी आणि आदित्य गाडीतच बसून राहिले. बराच वेळाने एका बाईकवरून

दोन तरुण आले. त्यांची दाढी वगैरे वाढली होती. त्यांच्याकडे पाहून ते गुंड, मवाली वाटत होते. असे विद्याधरचे मित्र असतील असं आदित्यला वाटेना. ती तिघ काहीतरी महत्वाचं बोलत होती. अचानक त्यांच्यातला एक तरुण चिडला विद्याधरने त्याला थोपवायचा प्रयत्न केला पण तो चांगलाच चिडला. दुसऱ्या तरुणाने विद्याधरची गचांडी पकडली. आदित्यला काही समजायच्या आत त्या दुसऱ्याने सुरा काढला आणि विद्याधरवर वार केला. विद्याधर जीवाच्या आकांताने ओरडला. मंजिरीची बोबडीच वळली. तिचे हातपाय कापायला लागले. निर्मनुष्य जागा, रात्रीची वेळ, त्यात भरीस भर वादळी पाऊस सुरु झाला होता. ओरडलं तरी कोणाला ऐकू येणार नाही आणि बाहेर निपचित पडलेला विद्याधर . आदित्यचं अपंगत्व तिला प्रकर्षाने जाणवलं. तिला प्रचंड एकाकी वाटायला लागलं.

आदित्यची अवस्था वेगळी नव्हती. विद्याधरला कोसळताना त्याने पाहीलं. त्याला काहीच सुचेना. मोबाईल आठवला आणि त्याने मोबाईल ऑन केला. पण झालं उलटच. मोबाईलचा एवढा प्रखरं प्रकाश पडला कि त्या मारेकर्यांना कारमध्ये कोणीतरी आहे हे समजलं. त्यातल्या एकाने आदित्यच्या बाजूकडचा दरवाजा उघडला आणि त्याला फरफटत बाहेर ओढले. बेसावध आदित्य जमिनीवर धाडकन कोसळला. मंजिरी एकदम ओरडली त्यामुळे दुसऱ्याने तिलाही बाहेर काढली.

“अरे लंगडा आहे. याला चालता येत नाही,” उठण्याची धडपड कारणाऱ्या आदित्यला पाहून एक तरुण म्हणाला.

“ए गाडीत आणि कोणी नाहीये ना? यांनी आपल्याला या चोर विद्याधरला मारताना पहिलय. यांनाही संपवूया आणि यांच्या बॉडी खाली व्हाळात फेकून देऊ,” दुसरा तरुण म्हणाला.

आदित्यच्या हृदयाची धडधड वाढली. त्याच्या डोळ्यासमोर मंजिरीला त्या मारेकऱ्याने पकडलं होतं. मंजिरी त्याच्या तावडीतून सुटण्याचा आटापिटा कारत होती. त्या माणसाने सुरा काढला. विद्याधरच्या रक्ताने माखलेला सुरा पाहून मंजिरीला मृत्युची भीषणता कळली. ती जीव खाऊन ओरडली, “आदित्य मला वाचव, मला मरायचं नाही. प्लीज.”

तो प्रसंगच भयानक होता. आदित्यच्या डोळ्यासमोर एकच लक्ष्य होतं कि काहीही करून मंजिरीला वाचवायचं. त्याने हातावर जोर दिला. तो उठायचा प्रयत्न करू लागला आणि परत पडला. त्याने डोळे बंद केले आणि बंद डोळ्यांसमोर मंजिरीचा सात्विक चेहरा उभा

राहिला. सर्व शक्तीनिशी तो उठला. त्याच्यात दहा हत्तींचं बळ आलं होतं. त्याने जोरात आरोळी ठोकली आणि बेसावधपणे जवळ उभ्या असलेल्या त्या मुलाला एकच ठोसा मारला. तो मुलगा जमिनीवर पडून विव्हळू लागला. आदित्यने त्याचा मोर्चा मंजिरीला पकडलेल्याकडे वळवला. त्याने त्याची गचांडी पकडली आणि त्याला वर उचललं. तो मुलगा हवेतच हात-पाय मारू लागला. आदित्यच्या डोळयात अंगार फुलला होता. त्याने त्याच्या गळयावरची पकड घट्ट केली आणि तो म्हणाला, "तुझी हिम्मत कशी झाली मंजिरीला हात लावायची !".

इकडे गंमत झालो. विद्याधर उठला आणि आदित्यला त्या मुलापासून सोडवायला लागला. त्याला उठलेल पाहून मंजिरीने जोरात किंचाळी मारली. त्यामुळे आदित्यची पकड सैल झाली. तो थोडा भानावर आला.विद्याधरला उभा असलेलं पाहून आदित्यला अर्थबोध होईना. विद्याधर हसायला लागला. त्याबरोबर आदित्यला वाटलं त्याने हि सर्व गंमत केली. एवढी भीषण गमंत. पाउसाचा जोम कमी झाला होता तरी चांगलाच अंधार पडला होता.

आदित्यने त्याही परिस्थितीत विद्याधरच्या गालावर जोरदार चपराक मारली आणि तो उद्ववेगाने म्हणाला, "विध्याधर तू मस्करी केलीस आमची? अरे मंजीरीला काही झालं असतं तर? बोल का केलंस तू असं." परंतू विद्याधरवर त्याचा परिणाम झाला नाही. उलट त्याने आदित्यला कडकडून मिठी मारली आणि म्हणाला, "वेड्या तू खाली तर बघ. स्वतःच्या पायावर उभा आहेस."

बस्स! असं म्हणतात जी गोष्ट आपल्याला तीव्रपणे हवी असते ती अचानक ध्यानीमनी नसताना जेव्हा मिळते तेव्हा कोण आनंद होतो. आदित्यचं तसंच झालं. त्याला एवढा आनंद झाला. लहान मुलांसारखा तो जमिनीवर बसला आणि एकदम मोठ्याने रडायला लागला. कधीकधी अति आनंदही आपल्याला झेपत नाही आणि हे असं होतं.

सर्वच घटना एवढ्या जलद झाल्या कि मंजिरीला व्यक्त व्हायलाच वेळ मिळाला नाही. जेव्हा तिला समजलं कि समोर उभा ठाकलेला मृत्यू हा खरं तर नवसंजीवनी देणारा आहे तेव्हा तिला परमेश्वराचे आभार कसे मानावेत हेच कळेना. तिने त्या क्षणाची तर आतुरतेने वाट पहिली होती. आदित्य बरा झाल्यावर काय-काय करायचं सर्व तिने ठरवलं होतं. स्वप्नरंजन कितीही केले तरी प्रत्यक्षात घडल्यावर आपल्याला ते आश्चर्यकारकच वाटते. मंजिरीने विद्याधरचे पाय धरले आणि ती म्हणाली, "विद्याधर आयुष्यभराचे उपकार केलेत तुम्ही. तुमचे

ऋण कधीच फिटणार नाहीत."

विद्याधरनेही मंजिरीसमोर हात जोडले. त्याच्या मनातला तिच्याप्रती आदर बाहेर आला. तो म्हणाला "मंजिरी मी फक्त निमित्तमात्रच आहे. कर्ताकारविता परमेश्वर. चला सर्वजण घरी जाऊंया. सर्वजण चांगलेच भिजलोय. आजारी पडायचो." त्याने आदित्यला हात दिला. आदित्य त्याच्या हाताला धरून उभा राहिला.

सर्वजण घरी आले. मामा, मामी, वल्लभ खूप काळजीत होते. वल्लभ सारखा फोन लावत होता पण कोणाचाच फोन लागत नव्हता. गडगडाटी पावसामुळे त्याला सर्वांची काळजी वाटत होती. अखेर तो मामांना घेऊन सर्वाना शोधायला निघणारच होता तोच विद्याधरची कार त्याला दिसली. सर्वांचा जीव भांड्यात पडला. पण पुढच्याच क्षणी जेव्हा विद्याधर कारमधून उतरला तेव्हा त्याचा शर्ट रक्ताने माखलेला त्याला दिसला. त्यामुळे सगळे खूप घाबरले. विद्याधरने हातानेच त्यांना शांत केलं आणि आदित्यला हाक मारली. आदित्य कारचा दरवाजा उघडून बाहेर आला. पूर्वीसारखा त्याला स्वतःच्या पायावर उभं असलेलं पाहिल्यावर वल्लभने जोरात आनंदाने आरोळी ठोकली. एका उडीत तो आदित्यकडे गेला. त्याने त्याला कडकडून मिठी मारली. "आदित्य, कसं झालं हे? काही समजत नाही. मला विचारायचंही नाही. भावा तुझ्यासाठी मी खूप खुश आहे.

त्या दोघांचं प्रेम पाहून सर्वांचेच डोळे पाणावले. मामा विद्याधरला म्हणाले, "विद्या अरे काय चाललंय सर्व ? आम्हाला समजेल का? तुला किती लागलंय?"

"मामा आधी आम्ही सर्व आंघोळ करतो मग बोलू. एकाला येतायेता हॉस्पिटलमध्ये ठेवलं. त्यामुळे उशीर झाला. जरा धीर धरा सर्व सांगतो." असं म्हणून तो आत गेला. मामीनी सर्वांसाठी गरमगरम कांदा-बटाटा भजी केली. आलं-वेलची घालून चहा केला. लीनाने गोडाचा शिरा केला. सर्वजण दिवाणखान्यात बसली. विद्याधरने बोलायला सुरवात केली.

"मी जास्त ताणत नाही. सरळ मुद्याचच बोलतो. जेव्हा मी वल्लभला भेटलो तेव्हा मला समजलं कि आदित्यला एखादा जबरदस्त धक्का बसला तर तो पूर्वीसारखा चालू शकतो. जेव्हा मी जोसेफ मर्फिंच 'द पॉवर ऑफ सबकॉन्शीअसं माइंड' हे पुस्तक वाचल त्यानंतर माझी खात्री झाली. मग मी डॉक्टर त्रिपाठींना भेटलो आणि अंतरमनाबद्दल अधिक माहिती मिळवली. मला एक प्रयोग करायचा होता. परंतू नक्की काय करायचं ते मला सुचत नव्हतं. त्यानंतर मी

आदित्यच्या घरी गेलो. तेव्हा मंजिरीचं काहीतरी चिरताना बोट कापल आणि त्यावर आदित्यची प्रतिक्रिया खूपच तीव्र होती. तेव्हाच माझ्या डोक्यात प्लँन तयार झाला. नशिबाने सर्व इकडे यायला तयार झाले. मी माझ्या दोन मित्रांना तयार केलं आणि मग मुद्दाम कार आडबाजूला लावली. त्यांनी माझ्यावर हल्ला केला मला मारलं हे नाटक होतं. खरा उद्देश मंजिरीला मारण्याचा होता. बस्स मग आदित्य अपोआपच तिला वाचवण्यासाठी पुढे आला.

सर्वांनी टाळया वाजवल्या. वल्लभ म्हणाला, “ब्रेव्हो विद्याधर अरे पण मला सांगायचस. मी तुला मदत केली असती.”

“अरे वल्लभ एखाद महत्वाचं काम करायचं असलं तर त्यावर जास्त चर्वीचर्वण करू नये. म्हणून नाही सांगितलं.”

“विद्याधर तुला कल्पना नाही माझ्यासाठी केवढी मोठी गोष्ट होती ती . मित्रा अपंगत्व अनुभवलंय मी. तुझे आभार कसे मानू कळत नाही. आभारी आहे, थँक्यू हे शब्द खूपच लहान वाटतात मला,” आदित्यने विद्याधरचे हात हातात घेतले.

“माझ्यासाठी एक करशील ?” विद्याधरने विचारले.

“बोल फक्त बोल. लगेच करतो,” आदित्य म्हणाला.

“तुझ्या मनातल्या भावना मंजिरीसमोर व्यक्त कर,” विद्याधर अगदी हळू आवाजात पुटपुटला. आदित्यच्या चेहऱ्यावर पुनश्च आनंद बहरला.

“काय हळूहळू बोलताय? आम्हालाही कळुदे,” वल्लभ म्हणाला. तसा आदित्य मंजिरीकडे गेला. मंजिरी सोफ्यावर बसली होती. उंच आदित्यला तिच्या समोर उभ राहून उपयोग नव्हता. तो गुढग्यांवर बसला. त्याच्या या कृतीने मंजिरीला खूप लाजल्यासारखं झालं. आदित्य म्हणाला, “मंजिरी तुझ्याबाबतीत मी नेहमीच चुकलो. पण मी तुझ्याशी मुद्दाम नाही वागलो. ज्यावेळी माझ्याकडे सर्व होतं त्यावेळी तू मला नको होतीस आणि माझ्या पडत्या काळात तुला कोणत्या तोंडाने मी मागणी घालणार होतो. आज मला तुला काही सांगायचे आहे. तू मला आयुष्यभरासाठी माझ्या आयुष्यात हवी आहेस. माझ्याशी लग्न करशील?”

मंजिरीला सर्वच स्वप्नवत वाटत होतं. आदित्य स्वतःहून मागणी घालेल असं तिला वाटलंच नाही. तिचे डोळे आनंदाश्रूनी भरले. कंठ दाटून आल्याने तिला बोलता येईना. तिने

मानेनेच होकार दिला.

“हुर्रर....वल्लभने जोरात टाळी मारली. सर्वांनी प्रतिसाद दिला.

फोनवर लगेचच आनंदाची बातमी आदित्य आणि मंजिरीच्या घरी कळवली. गोविंदराव आणि गायात्रीबाई ताबडतोब आले. सर्वांनी मिळून पुन्हा गणपतीपुळयाला गजाननाचे दर्शन घेतले. मंजिरीच्या घरच्यांनी सर्वाना अगत्याने बोलावले. मग गाड्या भरून सर्वजण सावंतवाडीला मंजिरीच्या घरी गेली. तिथेच दोघांचा साखरंपुडा झाला. अशाप्रकारे एका गोड नात्याचा सर्वांच्या आशीर्वादाने श्रीगणेशा झाला. परमेश्वराचे चिंतन कोणत्याही कठीण प्रसंगातून बाहेर पडण्याचे बळ देते. फक्त त्यासाठी सर्व मंगल घडावे अशी भावना असावी लागते. प्रारब्ध कर्मानुसार ज्याच्या त्याच्या आयुष्यात चांगले-वाईट प्रसंग येत असतात. परंतू म्हणून वाईट प्रसंगाने कोणी खचून जाऊ नये. लक्षात ठेवावे ‘जिसका अंत भला वो सब भला!’

# ई साहित्य प्रतिष्ठान

आता मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

किंवाesahity@gmail. comला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app.

https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks

या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे… कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य